**अतारांकित प्रश्नोत्तरांची ४० वी यादी**

# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### मुंबई शहरामध्ये बेस्ट बसचे होत असलेले अपघात

**(१) ९ (२७-०४-२०२५). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरामध्ये मागील पाच वर्षात बेस्ट बसचे ८३४ अपघात झाले असून त्यामध्ये ८८ लोकांना जीव गमवावा लागल्याचे माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेस्टच्या स्वमालकीच्या बसकडून ३५२ अपघात घडले असून जीव गेलेल्यांची संख्या ५१ आहे तर भाडे तत्वावरील बसचे ४८२ अपघात घडले असून त्यात ३७ लोकांना प्राण गमवावे लागले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अपघातांमध्ये प्राण गमावलेल्या नातेवाईकांना तसेच जखमींना आतापर्यंत ४२.४० कोटींची भरपाई उपक्रमाकडून देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर चौकशी प्रकरणी मुंबई शहरातील बेस्टच्या बसेस चे अपघाताचे प्रमाण कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपायोजना केली तसेच सार्वजनिक वाहतूक वाहनांसाठी कडक नियमावली आणि तपासणी प्रक्रिया सुनिश्चित करण्याबाबत कोणता धोरणात्मक निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०३-२०२६) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) वारंवार होणारे अपघात टाळण्याकरीता बेस्ट उपक्रमाद्वारे खालील उपाययोजना अंमलात आणल्या आहेत.

बेस्ट उपक्रमाच्या स्वमालकीच्या तसेच भाडे तत्वावरील बसगाड्यांवर नियुक्त बसचालकांना २८ दिवसांचे वाहन चालन प्रशिक्षण देण्यात येत आहे.

वाहतूक व अभियांत्रिकी विभागाच्या अधिकाऱ्यांच्या समन्वयाने मार्गावरील बस चालकांची वाहन चालन पद्धती तपासून त्या नुसार सदोष बसचालकांवर कार्यवाही करण्यात येते.

उपक्रमातील बस चालकांची तसेच भाडेतत्वावरील बसगाडयांवर नियुक्त करण्यात आलेल्या बस चालकांची वेळोवेळी मद्यप्राशन तपासणी करीता श्वास विश्लेषक चाचणी (Breath Analyser Test) यंत्राव्दारे तपासणी करण्यात येते.

भाडेतत्वावरील बस पुरवठादार व्यावसायिक संस्था व बेस्ट उपक्रम यांच्या दरम्यान झालेल्या करारातील तरतूदींनुसार प्रत्येक प्राणांतक अपघातानंतर संबंधित व्यावसायिक संस्थेवर रुपये ५० हजार ची आर्थिक दंडात्मक कारवाई करण्यात येते. त्याचप्रमाणे सदर अपघातातील देय नुकसान भरपाईची रक्कमेची प्रतिपूर्ती संबंधित व्यावसायिक संस्थेच्या देयकातून करण्यात येते.

भाडेतत्वावरील बस पुरवठादार व्यावसायिक संस्था यांच्या बसगाडीव्दारे झालेल्या प्राणांतक अपघातानंतर तातडीने सदर बसचालकास संबंधित व्यावसायिक संस्थेव्दारे बडतर्फ करण्यात येते.

वाहतूक पोलिस व प्रादेशिक परिवहन विभाग यांच्या समन्वयाने उपक्रमातील चालकांना वाहतूक नियमांचे पालन करण्यासंबंधी समूपदेशन तसेच मार्गदर्शन करण्यात येते.

मुंबई शहरातील वाहतूकीस अडथळा ठरणारी रस्त्यांवरील अनधिकृत बांधकामे, फेरीवाल्यांची अतिक्रमणे व रस्त्यावरील दुतर्फा पार्किंग इ. वर वेळोवेळी कार्यवाही करण्याकरीता संबंधित आस्थापना उदा. बृहन्मुंबई महानगरपालिका, वाहतूक पोलिस, मुंबई इत्यादींशी पत्र व्यवहार करुन सातत्याने कारवाई करण्याकरिता पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वसई विरार महानगरपालिका हद्दीत अनधिकृत बांधकाम सुरु असताना आदिवासी महिलेचा झालेला मृत्यू

**(२) १०२ (०१-०५-२०२५). श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई विरार महानगरपालिका हद्दीत अनधिकृत बांधकाम सुरू असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामण गावाजवळ अनधिकृत बांधकाम सुरू असताना भिंत कोसळून एक आदिवासी महिला ठार झाली असून तीन कामगार जखमी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी विकासक आणि ठेकेदाराने हे प्रकरण दडपण्याचे पूर्णपणे प्रयत्न केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विकासक व ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०२-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वालीव कार्यक्षेत्रातील गाव मौजे कामण, स.नं.८४, हि.नं.२, बेलकडी टेकडी सागपाडा, देवदळ, वसई (पूर्व) येथे सरोज पॉलीप्लास्ट या कंपनीच्या बाजूला अंतर्गत पोटमाळयाचे बांधकाम चालू असताना एका महिलेचा स्लॅब कोसळून मृत्यू झाल्याची घटना नायगाव पोलीसांमार्फत कळताच सदर प्रकरणी, अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागामार्फत प्रत्यक्ष पाहणी करून अंदाजे १५००० चौ.फूट औद्योगिक गाळयाचे बांधकाम निष्कासित करण्यात आले.

तसेच, जागामालक श्री.नितीश जैन/निजेश जैन/सरोज जैन व विकासक श्री. प्रदीप गुप्ता यांच्यावर नायगाव पोलीस ठाणे येथे क्रमांक ४८३/२०२४, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०५,२३८,३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई शहरात महिलांसाठी असलेल्या प्रसाधनगृहांची झालेली दुरवस्था

**(३) २७३ (०१-०५-२०२५). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात नोकरदार महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात असतांना महिलांसाठी अनेक रेल्वे स्थानका बाहेर, झोपडपट्ट्यांमध्ये प्रसाधनगृहांची समस्या गंभीर झाल्याने शहरात महिलांसाठी स्वच्छतागृहे उपलब्ध करुन देण्याची

मागणी महामुंबईतील महिलांनी दिनांक १७ नोव्हेंबर, २०२४ वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई महापालिका सार्वजनिक स्वच्छतागृहे उभारण्यात दुर्लक्ष करत असून सार्वजनिक स्वच्छता गृहे बांधल्यावर देखभाल दुरुस्ती अभावी अस्वच्छता दुर्गंधीमुळे अनेक ठिकाणी महिला स्वच्छता गृहाचा वापर करत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन पुरेशी महिलांसाठी स्वच्छतागृहे बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) मुंबईतील विविध झोपडपट्ट्यांमध्ये आर सी सी पद्धतीचे, तळ, तळ+१, तळ+२ मजल्याचे १४१६६ शौचकुपांसह ५५९ सामुदायिक शौचालय बांधण्यासाठी सन २०२३ मध्ये २८ निविदा मागवून कंत्राटदार नियुक्त करण्यात आले आहेत. सद्यस्थितित १३० सामुदायिक शौचालय बांधण्याचे काम करण्यात येत असून त्यापैकी ३७ सामुदायिक शौचालयाचे बांधकाम पूर्ण झाले आहेत व ९३ सामुदायिक शौचालयाचे कामे प्रगती पथावर आहे.

लॉट-१२ अंतर्गत बांधण्यात येणारे सामुदायिक शौचालयांचे काम पूर्ण झाल्यावर त्यांचे वापर व दैनंदिन देखभालीसाठी वस्ती पातळीवरील संस्था तयार करून त्यांच्या सोबत करार करून त्यांना सोपविण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहिल्यानगर महापालिका हद्दीतील सफाई कामगाराच्या समस्याबाबत**

**(४) ३५१ (२७-०४-२०२५). श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहिल्यानगर महापालिका हद्दीतील सफाई कामगार व अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातील नागरिकांच्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, असे आदेश राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांनी महापालिका, जिल्हा प्रशासन व पोलिस दलाला दिलेले असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास दिले असल्याचे निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांना नियुक्त्या देणे, कर्मचाऱ्यांचे इतर सेवाविषयक प्रश्न आदींवर सूचना देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, अहिल्यानगर जिल्ह्यातील नगरपंचायत, नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांचा आढावा घेऊन रिक्त जागा, लाड-पागे समितीच्या शिफारसीनुसार करावयाच्या नियुक्त्या, सफाई कामगारांना दिल्या जाणाऱ्या सुविधा याबाबत अहिल्यानगर जिल्हा प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०२६) :** (१) व (२) होय हे खरे आहे.
(३) लाड - पागे अंतर्गत नियुक्ती, पदोन्नती, सफाई कामगारांना दिल्या जाणाऱ्या सुविधा बाबत नगरपरिषद /नगरपंचायत यांना जिल्हाधिकारी कार्यालयाकडून वेळोवेळी निर्देश दिले जातात तसेच अहिल्यानगर महानगरपालिका मार्फत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३

वि.स. ४० (4)

मधील तरतुदीनुसार सर्व सफाई कामगारांच्या पात्र ठरणाऱ्या वारसांना नोकरी देण्याची कार्यवाही चालु असुन दिनांक २० जानेवारी, २०२६ अखेर २७२ वारसांना नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत. उर्वरित ७५ वारसांनी संपुर्ण कागदपत्र सादर केल्यानंतर नियुक्ती आदेश देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे महापालिका क्षेत्रातील मुंब्रा-कौसा विभागातील नागरिकांच्या पाण्याची समस्या सोडविण्याबाबत

**(५) ४५८ (२८-०४-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महापालिका क्षेत्रातील मुंब्रा-कौसा विभागातील नागरीकांच्या हक्काचे १७ लाख लिटर पाण्याची चोरी झाल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी, नागरीकांनी ठाणे महापालिका आयुक्त यांचे कार्यालयासमोर दिनांक ६ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास ठिय्या आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार मुंब्रा-कौसा भागातील पाण्याची कुत्रिम टंचाई दुर करुन नागरीकांच्या पाण्याची समस्या सोडविण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०२-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी, नागरिकांनी ठाणे महापालिका आयुक्त यांचे कार्यालयासमोर दिनांक ०६ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास ठिय्या आंदोलन केले हे खरे आहे. मात्र मुंब्रा-कौसा विभागातील नागरिकांच्या हक्काचे १७ लाख लिटर पाण्याची चोरी होत आहे ही बाबा खरी नाही. मुंब्रा-कौसा भागासाठी निर्धारित केलेल्या कोट्याप्रमाणे दररोज ४१ द.ल.लि. पाणी पुरवठा करण्यात येत आहे,ही वस्तुस्थिती आहे.
(२) मुंब्रा-कौसा भागातील नागरिकांच्या पाण्याची समस्या सोडविण्यासंदर्भात खालीलप्रमाणे उपाययोजना केली आहे:

१. मुंब्रा-कौसा भागाकरिता पाणीपुरवठा करणाऱ्या ६६० मी.मी. व्यासाच्या मुख्य व उप जलवाहिनीवरील एकूण २०३ अनधिकृत नळ संयोजन निष्कासित केले आहेत व ५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

२. भोलेनाथ नगर नाल्याखालील मुख्य जलवाहिनीवर वारंवार अनधिकृत नळ संयोजन होत असल्याने सदर नाल्याखालील जलवाहिनी कायमस्वरूपी बंद करून सदर जलवाहिनी नाल्याच्या स्लब वरून रस्त्यालगत टाकून कार्यान्वित केलेली आहे.यामुळे या ठिकाणी मुख्य जलवाहिनीवरून होणारी पाणी चोरी पूर्णपणे बंद झालेली आहे.

३. अनधिकृत नळ संयोजन खंडित करण्याकरिता विशेष पथके स्थापन करण्यात आलेली आहेत.

४. मुंब्रा-कौसा भागातील प्रभाग क्रमांक ३२ मध्ये ३५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी कार्यन्वित करण्यासाठी रु.५९.८३ लक्ष इतक्या रकमेचे काम हाती घेण्यात आले आहे.सदरचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील कामाठीपुरा परिसरातील इमारतींच्या पुनर्विकासाबाबत

**(६) ४६३ (०१-०५-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कामाठीपुरा परिसरातील इमारतींच्या पुनर्विकास आराखड्यास शासनाने मान्यता देऊनही अद्यापर्यंत कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कामाठीपुरा येथील इमारतीच्या प्रलंबित पुनर्विकासाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०४-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) दक्षिण मुंबईतील कामाठीपुरा गल्ली क्र. १ ते १५ या भागातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त व बिगर उपकरप्राप्त इमारतींचा समुह पुनर्विकास विकास नियंत्रण नियमावली ३३(९) मधील तरतुदीनुसार म्हाडातर्फे करण्याबाबत दिनांक १२ जानेवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार म्हाडातर्फे सदर समुह पुनर्विकास प्रकल्पाची व्यवहार्यता तपासण्यासाठी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने वास्तुशास्त्रज्ञांची नेमणूक केली असून, त्यांच्यातर्फे इमारतीमध्ये राहणाऱ्या भाडेकरु/रहिवाश्यांची पात्रता निश्चित करण्याकरीता प्रत्यक्ष जागेवर सर्वेक्षण करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. नगर विकास विभागाने दिनांक ०९ जुलै, २०२५ रोजीच्या अधिसूचनेन्वये म्हाडाला "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून घोषित केले आहे. तसेच सदर पुनर्विकासाकरीता निविदा प्रक्रिया म्हाडामार्फत प्रसिध्द करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेत अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्याबाबत

**(७) ५७५ (२८-०४-२०२५). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील केईएम रुग्णालयामध्ये कक्ष परिचर या पदावर कार्यरत असताना मृत्यू झालेल्या सयाजी भागोजी अडांगळे यांच्या वारसदारास अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्यासाठी गेल्या २४ वर्षापासून केईएम रुग्णालय व महापालिका मुख्यालयात पायपीट सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतक्या वर्षात पालिका प्रशासनाकडून त्यांना कधीही सहकार्य मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अनुकंप तत्वावर नोकरी मिळण्याकरीता २४ वर्ष विलंब झाल्याची कारणे काय असून सयाजी भागोजी अडांगळे यांच्या वारसदारास नोकरी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) केईएम रुग्णालयातील उपलब्ध अभिलेखानुसार मयत कर्मचारी श्री. सयाजी भागोजी अडांगळे हे खाडाबदली कक्ष परिचर असल्याचे निदर्शनास येते. यावरुन सदर कर्मचारी महानगरपालिकेच्या नियमित सेवेत नसल्याचे स्पष्ट

होते. महानगरपालिकेत नियमित सेवेत नसलेल्या कर्मचारी कामगाराचा मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसदारास अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याबात महानगरपालिकेचे कोणतेही धोरण नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अंधेरी पूर्व येथील विकास नियोजन आरखड्यातील विकास नियोजन (DP) रस्ते खुले करण्याबाबत

**(८) ६३६ (०१-०५-२०२५). श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमधील अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघात महापालिकेच्या विकास नियोजन आराखड्यानुसार १२ पेक्षा अधिक विकास नियोजन (DP) रस्ते वाहतुकीसाठी खुले करण्यात आले नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचे विकास नियोजन (DP) रस्ते खुले नसल्याने मोठ्या प्रमाणात होणारी वाहतुकीची समस्या लक्षात घेऊन तातडीने (DP) रस्ते खुले करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीने माहे डिसेंबर, २०२४ मध्ये नागपुर येथे झालेल्या अधिवेशनामध्ये केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचे (DP) रस्ते खुले करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही,
(२) हे खरे आहे.
(३) विकास नियोजन आराखडयातील १६ रस्त्यांच्या कामांपैकी ७ कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरित ९ रस्त्यांचे रस्ता रुंदीकरणाचे काम प्रधान्यक्रमाने सुरु करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मालेगाव ( जि.नाशिक ) महानगरपालिका हददीतून जाणाऱ्या जुन्या महामार्गाचे काम अनेक वर्षापासून रखडलेले असल्याबाबत

**(९) ७१७ (२८-०४-२०२५). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव (जि.नाशिक) तालुक्यातील महानगरपालिका हददीतून जाणाऱ्या जुन्या महामार्गाचे काम गत तीन ते चार वर्षापासून प्रलंबित असल्याचे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रलंबित कामामुळे वाहनांचेही नुकसान होत असून यामुळे सर्वसामान्य नागरिकांसह वाहनचालकही त्रस्त आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त महामार्गाच्या प्रलंबित कामाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० ऑक्टोंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास आंदोलन करुनही अदयाप रस्त्याचे काम पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी महामार्गाचे काम प्रलंबित असून याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०२६) :** (१) होय हे खरे आहे.
(२) सदरील रस्ता हा काँक्रीटीकरणाने करण्यात येत असल्याने एक बाजू पूर्ण करून एकेरी वाहतूकीसाठी खुला करण्यात येतो. कारण सिमेंट काँक्रीटच्या कामासाठी किमान २१ दिवसांचा क्युरींग पिरिअड द्यावा लागत आहे.
(३) मा. विधानसभा सदस्य (मालेगाव मध्य) यांनी आंदोलन केले होते. त्यावेळी मनपा निधीतून रु. २०.०० कोटी इतक्या रकमेची निविदा मागवून काम पुर्ण करून घेण्यात आलेले आहे.
(४) व (५) मालेगाव (जि. नाशिक) महानगरपालिका हद्दीतून जाणाऱ्या जुन्या महामार्गाची एकूण लांबी ५.५४ किमी. इतकी आहे. या कामासाठी एकूण ०४ टप्प्यात वेग वेगळया आर्थिक वर्षात रस्ता काम हाती घेऊन पुर्ण करण्यात येत आहे, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तांत्रिक मंजूरी देखिल घेण्यात आलेली होती. त्यासाठी मनपाने रु. १४,७८,९९७/- इतकी रक्कम खर्च केलेली होती.

सद्यस्थितीत फक्त १७० मी.चे काम निधी अभावी प्रलंबीत असून सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात या कामासाठी अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध होण्यासाठी प्रस्तावीत असून मंजूरी होताच ई निविदा मागवून काम पुर्ण करण्याचे महानगरपालिकेमार्फत नियोजन करण्या त आले आहे.

---

## पश्चिम नागपूरमध्ये सांडपाणी निचरा करण्याची व्यवस्था करण्याबाबत

**(१०) ७३० (२७-०४-२०२५). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पश्चिम नागपूरमध्ये जुनी आणि नवी अशा प्रकारच्या निवासी वसाहती असून अनेक भागांमध्ये सांडपाण्याच्या योग्य प्रणालीचा अभाव असल्यामुळे रस्त्यांवर सांडपाणी वाहताना आणि मोकळया जागेत साचले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सांडपाणी मोठ्या प्रमाणावर प्रदूषण, दुर्गंधी, डासांची उत्पत्ती आणि इतर अनेक समस्यांना कारणीभूत ठरत असूनसर्वाधिक डेंग्यू, मलेरिया, आणि चिकुनगुनिया या रुग्णाच्या संख्येत वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सांडपाणी व्यवस्थेसाठी योग्य अभ्यास करून निधी मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.
नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्रात पश्चिम नागपूर विधानसभा क्षेत्रातील मौजा दाभा, मौजा हजारीपहाड, मौजा बोरगाव, मौजा गोरेवाडा, मौजा पोलीस लाईन (टाकळी) व मौजा झिंगाबाई टाकळी ही गावे येतात. सदर क्षेत्रात सांडपाणी वाहून नेण्याकरीता पाईपलाईन टाकण्यात आलेली असून दोन ठिकाणी मलजल प्रक्रिया केंद्र (एस.टी.पी.) बांधण्यात आलेली आहेत
(२) हे खरे नाही.
नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या सर्वेक्षणानुसार पश्चिम नागपूर क्षेत्रातील, डेंग्यू, मलेरिया आणि चिकनगुनिया या रुग्णांच्या संख्येचे सन २०२४ व २०२५ मधील तुलनात्मक अहवालाचे निरीक्षण केले असता वाढ झाल्याचे दिसून येत नाही.
(३) जलशक्ती मंत्रालय, भारत सरकार यांचे मार्फत पुरस्कृत जपान इंटरनॅशनल कॉर्पोरेशन एजंसी यांच्या सहाय्याने नागपूर नदी प्रदुषण निर्मुलन प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाकरिता नागपूर महानगरपालिका ही कार्यान्वयन यंत्रणा असून सदर प्रकल्पाकरीता एकूण रु.१९२६.९९ कोटी रक्कमेस मान्यता प्राप्त आहे. या

प्रकल्पाअंतर्गत सेंट्रल सिवरेज झोन व नॉर्थ सिवरेज झोन करीता अनुक्रमे रु.२८९.२९ कोटी व रु.२५३.१७ कोटी रकमेचा यात समावेश करण्यात आला. या प्रकल्पाअंतर्गत पश्चिम नागपूर विधानसभा क्षेत्रातील जुन्या व नविन वसाहतीतील सांडपाणी व्यवस्थापनेचा समावेश आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिका मुंबई येथील अधिसंख्य पदावरील कर्मचा-यांना न्याय मिळवून देण्याबाबत

**(११) ८३४ (२७-०४-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिका मुंबई येथील अधिसंख्य पदावरील कर्मचा-यांना न्याय मिळवून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी बल्लारपूर यांनी आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका मुंबई यांना दिनांक २ जानेवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) भांडुप पश्चिम येथे एकूण ०४ ठिकाणी स्व. हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे दवाखाने सुरु करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## एल बी टी कर रद्द केला असतानाही नागपूर महापालिकेकडून व्यापाऱ्यांना एलबीटी कराच्या नोटीस पाठवल्याबाबत

**(१२) १०२२ (०१-०५-२०२५). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर महापालिकेकडून व्यापाऱ्यांना नऊ वर्षानंतरही स्थानिक संस्था कर प्रणाली (एलबीटी) वर नोटीसा पाठविल्या असल्याचे माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एलबीटी कर रद्द केला असतानाही व्यापाऱ्यांना दिनांक ३१ जुलै, २०१३ रोजी वा त्यासुमारास शासनाने नोटीसा पाठवल्याने सर्व व्यापाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एलबीटीकराच्या दंडात आणि भरणा शुल्कात मोठ्या प्रमाणात वाढ केल्याने व्यापाऱ्यांवर अवास्तव बोजा पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने सन २०१५ साली रद्द केलेल्या एलबीटी कराच्या नोटीसा विलंबाने पाठवण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नोटीसा रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०२६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

रुपये ५० कोटी पेक्षा कमी वार्षिक उलाढाल असणाऱ्या व्यावसायिकांकरीता स्थानिक संस्था कर दिनांक ०१/०८/२०१५ पासून रद्द करण्यात आला, परंतु रुपये ५० कोटीच्या वर वार्षिक उलाढाल असणाऱ्या

व्यावसायिकांकरीता जुलै, २०१७ ला स्थानिक संस्था कर रद्द करण्यात आला. नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील व्यावसायिकांनी सन २०१३-१४, ते सन २०१५-१६ मध्ये रु. ५० कोटीच्या वर वार्षिक उलाढाल असणा-या व्यावसायिकांनी आर्थिक वर्ष २०१६-१७ व २०१७-१८ च्या त्या-त्या आर्थिक वर्षाकरीता स्थानिक संस्था कराचे विवरण पत्र विहीत कालावधीच्या आत नागपूर महानगरपालिकेत सादर करणे अपेक्षीत होते.

ज्या व्यावसायिकांनी स्थानिक संस्था कर विवरण पत्र सादर केले नाही अशा व्यावसायिकांना तसेच ज्या व्यावसायिकांनी निर्धारण आदेशाविरुध्द अपील दाखल केले अशा व्यावसायिकांना सुनावणी करीता नोटीस देण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

शासन अधिसूचना दिनांक १ ऑगस्ट, २०१५ अन्वये रुपये ५० कोटीपेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था करामधून सूट दिलेली होती. परंतू, रुपये ५० कोटी पेक्षा जास्त उलढाल असलेल्या व्यापाऱ्यांना नागपूर महानगरपालिका क्षेत्रात आयात मालावर जुलै, २०१७ पर्यंत स्थानिक संस्था कर भरणे व विवरणपत्र सादर करणे अनिवार्य होते.

(३) हे खरे नाही.

स्थानिक संस्था कर नियम ३३ च्या अंतर्गत स्थानिक संस्था कर विवरणपत्रांचे निर्धारण अंती नागपूर महानगरपालिकेस येणे असलेली रक्कम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ४०६, पोट-कलम (१), खंड (ड) अन्वये विवाद्य स्थानिक संस्था कर रक्कमेचा भरणा करुन अपिल सादर करणे आवश्यक आहे

(४) शासनाने सन २०१७ साली स्थानिक संस्था कर पुर्णतः रद्द केलेला होता. स्थानिक संस्था कर नियम ३३(७) अन्वये प्रत्येक आर्थिक वर्षाचे स्थानिक संस्था कर विवरणपत्राचे निर्धारण आर्थिक वर्ष संपुष्टात आल्यापासून पुढील वर्षात पूर्ण करणे आवश्यक होते, परंतु कोरोना कालावधी मध्ये व्यापारी प्रतिष्ठान बंद राहिल्याने व्यावसायिकांव्दारे आवश्यक दस्तऐवज सादर न झाल्याने, सुनावणीकरीता उपस्थित न झाल्याने दोन वर्षाच्या कोरोना कालावधीमध्ये कार्यवाही होवू शकली नाही. जुलै २०१७ ला स्थानिक संस्था कर रद्द झाल्यानंतर स्थानिक संस्था कर निर्धारणाकरीता पुढील पांच वर्ष विवरणपत्राच निर्धारण करण्याची तरतुद असल्याने व कोरोना कालावधीत कार्यवाही होवू न शकल्याने स्थानिक संस्था कर नोटीस विलंबाने पाठविण्यात आल्या आहेत.

(५) शासनाच्या दिनांक २४.०२.२०२५ च्या पत्रान्वये सर्व महानगरपालिकांमधील स्थानिक संस्था कर विभाग दिनांक ३०.०४.२०२५ पासून बंद करण्याबाबत सर्व महानगरपालिकांना निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार महानगरपालिकांकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## नवी मुंबईतील नेहरू सेक्टर १९ मधील स्वर्गीय आर आर पाटील उद्यानाची झालेली दुरवस्था

**(१३) १०३१ (०१-०५-२०२५). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील नेहरू सेक्टर १९ मधील स्वर्गीय आर आर पाटील उद्यानाची दुरवस्था झाल्याने नागरिकांसह लहान मुलांनाही नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे जानेवारी२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, या उद्यानात विदयुत दिवे, फाउंटन गजोबा, पाम, क्लॉक, विविध तुटलेले शिल्प, ॲम्पी थिएटर, प्रवेशद्वार, ओपन जिम, नादुरुस्त खेळणी, स्टेप वरील तुटलेल्या स्टाइल्स, अनेक ठिकाणी पडलेले डेब्रिज, नादुरुस्त

वॉटर कुलर या सर्व बाबींची झालेली दुरवस्था दूर करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०४-२०२६) :** (१) व (२) नेरुळ सेक्टर-१९ येथील स्वर्गीय आर. आर. पाटील उद्यानातील विद्युत दिवे व वॉटर कुलर नादुरूस्त असल्याचे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आल्यानंतर त्याची विद्युत विभागामार्फत त्वरीत दुरुस्ती करुन घेण्यात आलेली आहे.

तसेच, उद्यानात लहान मुलांना खेळण्यासाठी एम.ए.पी.एस. १ नग, डबल स्विंग १ झोका, सी-सॉ २ नग व प्लॅटफॉर्म एम.जी.आर. १ नग इ. खेळणी बसविण्यात आलेली आहेत. त्यापैकी, डबल स्वींग १ नग झोका नादुरुस्त झाला होता. सदरचा झोका तात्काळ दुरुस्त करण्यात आला आहे. सध्या सर्व खेळणी व ओपन जिम साहित्य सुस्थितीत आहेत. उद्यानातील डेब्रीज उचलून घेण्यात आले आहे. तसेच, उद्यानातील फाऊंटन सुरु आहे.

सदर उद्यानातील गजेबो, प्रवेशद्वार सुस्थितीत आहेत. ॲम्फी थिएटर मधील काही ठिकाणच्या तुटलेल्या टाईल्स दुरुस्त करण्यात आल्या आहेत. तसेच स्टेपवरील टाईल्स व शिल्प सध्या सुस्थितीत आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईमध्ये शहर व उपनगर मधील असणाऱ्या उड्डाणपूल, पादचारी पूल, स्काय वॉक, सब वे यांची झालेली दुरवस्था

**(१४) १०४२ (२९-०४-२०२५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमध्ये शहर व उपनगर मधील असणाऱ्या बहुतांश उड्डाणपूल, पादचारी पूल, स्काय वॉक, सब वे यांची दुरवस्था झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अश्या उड्डाणपूल, पादचारी पूल, स्काय वॉक, सब वे ची मोठ्या प्रमाणात करावयाची तातडीची दुरुस्ती निधी अभावी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई महानगर पालिकेने सन २०२४-२५ मध्ये रस्ते, वाहतूक आणि पूल विभागासाठी निधीची तरतूद केली असताना सदर निधी फक्त नवीन कामांसाठी वापरला जात असून जुन्या कामांसाठी या निधीचा वापर केला गेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जुन्या कामासाठी निधीचा वापर करुन दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०३-२०२६) :** (१), (२), व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील वाळकेश्वर येथील बाणगंगा तलावाच्या पुनरुज्जीवनाचा प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(१५) १०५२ (०१-०५-२०२५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वाळकेश्वर येथील बाणगंगा तलावाच्या पुनर्जीवन करण्याचे काम पुरातत्व वस्तू संग्रहालय विभागाच्या सूचीबद्ध कंत्राटदाराच्या माध्यमातून केले जाणार असल्याचे पालिका प्रशासनाने स्पष्ट केले असून देखील पुनरुज्जीवनाचा प्रकल्प आजमितीस प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलावाचे पुनर्जीवन करताना पहिल्या टप्प्यात दगडी पायऱ्यांची सुधारणा, दीप स्तंभाची पुनरुभारणी, भक्ती मार्ग विकसित करणे, मिसिंग लिंक विकसित करणे आदी कामे करण्यात येणार असून या प्रकल्पासाठी कंत्राटदाराची नेमणूक होऊनही त्याला कार्यादेश देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तलावातील गाळ काढताना आधीच्या कंत्राटदाराने पायऱ्यांचे नुकसान केले असल्याने कंत्राटदाराविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला असून विविध उत्सवाच्या निमित्ताने या ठिकाणी येणाऱ्या भाविकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयीचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, शासनाने बाणगंगा तलावाच्या पुनरुज्जीवनाचा प्रकल्प पूर्ण तसेच पायऱ्यांची डागडूजी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०३-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही

(३) सदर तलावातील गाळ काढतांना आधीच्या कंत्राटदाराने पायऱ्यांचे नुकसान केले होते. त्यानुसार पुरातत्व वस्तू संग्रहालय विभागाच्या लिखित सूचनेनुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

तसेच, बाणगंगा तलाव हा जी.एस.बी. ट्रस्टच्या निगराणीखाली असल्यामुळे भाविकांना दैनदिन सेवासुविधा पुरविण्याची जबाबदारी संबंधितांची आहे. सदर बाबत संबंधितास दिनांक १४/९/२०२४ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. सद्य:स्थितीत बाणगंगा तलावास भेट देणाऱ्या भाविकांच्या सोईसाठी विविध सोईसुविधा उदा. कपडे बदलण्याची तात्पुरती व्यवस्था, आवश्यक साफसफाई इत्यादी कामे नियमितपणे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहेत.

(४) सदर प्रकल्पातील पुरातन तलाव परिसर संवर्धनासंबंधी व तलावातील गाळ काढण्यासंबंधीत कामाकरीता कंत्राटदारांची निवड झालेली असून संबंधित कंत्राटदारास प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाल्यानुसार कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने सदर काम प्रगतीपथावर असुन सद्य:स्थितीत ४५% काम पूर्ण झाले असुन उर्वरीत काम वेळेत पूर्ण करण्याबाबत कंत्राटदारास योग्य ते निर्देश देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर शहरात केंद्रशासन व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणारी स्वच्छ अभियान योजना प्रलंबित असल्याबाबत

**(१६) १११० (०१-०५-२०२५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरात केंद्रशासन व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणारी स्वच्छ अभियान योजना प्रलंबित असल्याने शहरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले असल्याचे माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त समिती कागदावर असतानाही घनकचरा मोहिमेवर दर महिन्याला कोट्यावधीचा खर्च केला जात असल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास सोलापूर शहरात कचरा संकलनासाठी नेमलेल्या कंपनीने शहर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रशासनाने दुर्लक्ष करण्याची सर्वसाधारण कारणे काय,

(४) असल्यास सोलापूर शहरात स्वच्छ अभियान योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२ ) हे खरे नाही.

(३) दररोज संकलित करण्यात आलेला कचरा हा डम्पिंग यार्ड येथे न टाकता त्या कचऱ्यावर रोजचे रोज प्रक्रिया करुन वीज निर्मिती व कंपोस्टिंग करण्यात येते.

(४) सोलापूर महानगरपालिकेकडून स्वच्छ भारत अभियान अंतर्गत यथोचित कार्यवाही करण्यात येत असून शहरातील नागरिकांचे आरोग्य अबाधित राखणेचे दृष्टीकोनातून नियमित स्वच्छता व शहराचे सौंदर्य अबाधित राखणेकामी मनपा प्रशासन आवश्यक त्या सर्व उपाययोजना करीत आहे.

(५) विलंब झालेला नाही.

---

## सोलापूर मनपाने शहरातील जुना पुना नाका अन तुळजापूर नाका येथील सुशोभीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(१७) ११११ (०१-०५-२०२५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात मनपाने स्वच्छ वायू उपक्रमांतर्गत शहरातील जुना पुना नाका व तुळजापूर नाका येथील उड्डाणपूला खाली असलेल्या भित्तिशिल्पांचे व कृत्रिम फुलांच्या गालिचांचे सुशोभीकरण करण्यात आले होते त्यापैकी तुळजापूर नाका येथील भित्तिशिल्पांचे व कृत्रिम फुलांच्या गालीचांचे सुशोभीकरणाची दुरवस्था झाल्याने नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत असल्याची बाब माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुशोभीकरणाच्या कामाचा दर्जा निकृष्ट असल्याने भित्तीशील्प व कृत्रिम फुलांचे व पानांचे गालीच्या बसवण्याच्या लोखंडी फ्रेम काही महिन्यातच तुटली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दुरवस्था झालेल्या शिल्पाची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०२-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) जुना पुना नाका छत्रपती संभाजी महाराज चौक पुतळा परिसर सुशोभीकरणाचे काम दिनांक ३१.१०.२०२४ रोजी पूर्ण करण्यात आलेले असून जुना तुळजापूर नाका येथील सौदर्यीकरणाचे काम दिनांक १४.०१.२०२३ रोजी पूर्ण करण्यात आले आहे.

तुळजापूर नाका येथे दिनांक ०३.११.२०२४ रोजी पहाटे १.३० वा. अज्ञात वाहनाने पुलाखालील सुशोभीकरण केलेल्या कामास धडक दिल्यामुळे सुशोभीकरणाच्या कामापैकी भित्ती शिल्पांचे व कृत्रिम फुलांच्या गालिचांचे व गालिचा बसविण्याच्या लोखंडी फ्रेमचे नुकसान झालेले आहे. याबाबत पोलीस विभागाकडे तक्रार नोंदविण्यात आली आहे. तसेच, झालेले नुकसान संबंधित मक्तेदार यांच्याकडून दुरुस्त करण्यात आले असून सदर ठिकाणे ही लोकांसाठी खुली करण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील हद्दवाढ भागातील उद्यानांकडे महापालिका प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष

**(१८) १११८ (०१-०५-२०२५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील हद्दवाढ भागातील उद्यानांकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने अनेक वर्षापासून हिरवीगार असणाऱ्या उद्यानांची दुरवस्था झाली असल्याचे माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जुळे सोलापुरातील जानकी नगर, विडी घरकुल परिसरातील स्वर्गीय विष्णुपंत कोठे उद्यान वाकिंग ट्रॅक, फेवर ब्लॉक आणि इतर उद्यानात वाळलेले गवत, तुटलेली खेळणी, साचलेला कचरा व घाणीचे साम्राज्य आदींची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाल्याने नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, हद्दवाढ भागातील उद्यानांचे तातडीने सुशोभीकरण करून नागरिकांसाठी खुले करून देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०२-२०२६) :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

पानगळीच्या वेळी वाळलेला पालापाचोळा/कचऱ्याचे प्रमाण वाढल्याचे दिसून आले आहे. तसेच बागेमधील काही खेळणी व बाकडी नादुरुस्त झाली असून दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) सोलापूर महानगरपालिका शहर परिसर व हद्दवाढ भागातील उद्यानांची दैनंदिन देखभाल महानगरपालिकेच्या उद्यान विभागामार्फत करण्यात येत असून देखभाल दुरुस्तीची कामे महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालयाकडून करण्यात येतात.

सन २०२४-२५ च्या सोलापूर महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकातून हद्दवाढ भागातील जुळे सोलापूर जानकी नगर बागेत वॉकिंग ट्रंकवर लाल माती टाकणे, नळ जोडणीची कामे पूर्ण झालेली असून बाकड्यांची दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर आहेत.

तसेच, सन २०२५-२०२६ अंतर्गत सोलापूर जानकी नगर बागेत नादुरुस्त असलेली खेळणी  बदलून नवीन खेळणी बसविण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच, स्वर्गीय विष्णुपंत कोठे उद्यानामध्ये अमृत योजनेअंतर्गत मियावाकी पध्दतीने वृक्षारोपण करण्यात आले असून उद्यानांमध्ये नियमितपणे स्वच्छता करण्यासाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली असून त्यांच्यामार्फत उद्यांनाची स्वच्छता राखली जात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंधेरी पी.एम.जी.पी कॉलनीतील धोकादायक इमारतींचा पुनर्विकास प्रलंबित असल्याबाबत

**(१९) १२१६ (२८-०४-२०२५). श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जोगेश्वरी विधानसभा कार्यक्षेत्रातील अंधेरी पी.एम.जी.पी कॉलनीतील १७ धोकादायक इमारतींचा पुनर्विकास अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त इमारती अत्यंत जीर्ण झाल्या असूनाने इमारतीचा काही भाग वारंवार पडत असल्याने जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता असल्याने रहिवाशी जीव मुठीत घेऊन अनेक वर्ष वास्तव्य करित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, म्हाडा प्राधिकरणामार्फत सलग दोन वेळेस निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अंधेरी पी.एम.जी.पी कॉलनीतील धोकादायक इमारतींतील रहिवाश्यांच्या जिवीताचा गांभीर्याने विचार करुन अनेक वर्ष प्रलंबित असलेल्या पुनर्विकास तातडीने मार्गी लावण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०३-२०२६) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
सदर इमारती ह्या बृहन्मुंबई महानगरपालिका तत्वांनुसार सी-१ प्रवर्गात मोडत असल्याचे दिनांक २०.०६.२०२२ रोजीच्या संरचनात्मक परीक्षण अहवालात निदर्शनास आले आहे.
सदर प्रकल्प म्हाडामार्फत सी & डी ए (construction & development agency) ची नेमणूक करून राबविण्यासाठी म्हाडामार्फत दिनांक ०२.०७.२०२४ रोजी प्रथम मागणी व दिनांक ०६.०९.२०२४ रोजी व्दितीय मागणी प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु, सदर निविदांना प्रतिसाद प्राप्त झाला नाही.
(४) पी.एम.जी.पी. कॉलनी या म्हाडा वसाहतींतील इमारतींच्या पुनर्विकास प्रकल्पातील, पुनर्वसन व विक्री घटकांचे बांधकाम करण्याकरीता कंत्राटदाराच्या निविदा स्विकृतीस दिनांक २५.०९.२०२५ अन्वये शासन मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार म्हाडास्तरावर पुढील प्रक्रिया सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील जोगेश्वरी पूर्व येथील, महाराज भुवन तिवारी चाळीतील रहिवाशी मुलभुत सोयी-सुविधापासून वंचित असल्याबाबत

**(२०) १२२३ (०१-०५-२०२५). श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जोगेश्वरी–पूर्व येथील, महाराज भुवन तिवारी चाळीतील रहिवाश्यांना मुलभुत सोयी-सुविधा तात्काळ पुरविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराज भुवन येथील तिवारी चाळ येथे महानगरपालिकेच्या जागेवर असलेल्या झोपडीतील रहिवाश्यांना महापालिकेकडून सुविधा पुरविणे गरजेचे असतांना त्या पुरवितांना चाळीचा स्वयंघोषित मालक श्री.तिवारी हे वारंवार अडथळे निर्माण करुन कामास मनाई करत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सध्यस्थितीत तेथे असलेले शौचालय दुरुस्तीकरिता तोडण्यात आलेले असून यासंदर्भात संबंधित पोलिस ठाणे, महापालिका अधिकारी यांच्याकडून स्वयंघोषित मालकांना अभय दिले जात असल्याने रहिवाशी यांना मुलभुत सोयी-सुविधांपासून वंचित रहावे लागत आहेत.हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय निष्पन्न झाले तदनुसार उक्त चाळीतील रहिवाश्यांना मुलभूत सोयी-सुविधा पुरविण्यास विरोध करणा-या मालकाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) अंशत: खरे आहे.

श्री. हितेश मनिराम तिवारी यांनी सदर ठिकाणी शौचालय नुतणीकरण करण्यात येऊ नये याकरीता पत्र दिलेले आहे. तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सदर शौचालयाच्या नुतनीकरणाचे काम कार्यादेश देऊन पूर्ण करण्यात आलेले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई मालाड (पश्चिम) मालवणी, गेट नंबर-८, या जोड रस्ता रुंदीकरणाच्या व विकासाच्या कामाबाबत**

**(२१) १४२९ (०१-०५-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई मालाड (पश्चिम)येथील लगून रोड ते अब्दुल हमीद मार्ग, एम.एच.बी.शाळेजवळ, गेट नंबर-८, या जोड रस्ता रुंदीकरणाच्या व विकासाच्या कामामध्ये ४३१ बाधित स्ट्रक्चर्स येत असल्याचे दिनांक २८ जुन, २०२३ रोजी वा त्यासुमारास सहाय्यक आयुक्त पी/उत्तर विभाग यांच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ४३१ बाधित स्ट्रक्चर्समुळे मोठया प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, बाधितांचे पुनर्वसन/भरपाई रक्कम संबंधिताना अदा करुन रस्त्यावरील वाहतूक कोंडी दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०३-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे,
पी/उत्तर विभागामार्फत मालवणी लगून रोड ते अब्दुल हमीद मार्ग (बस डेपो जवळ) मालवणी, मालाड (प) मुंबई यांना जोडणाऱ्या ५५० मी. लांब व १८.३० मी. रुंद डी.पी. रस्त्यामध्ये एकूण ४३२ बांधकामे बाधित होत आहेत.

(२) अंशत: खरे आहे.
(३) सदर बाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियमांनुसार “कुरार पॅटर्न” अंतर्गत बाधित झोपडीधारकांना त्याच ठिकाणी बाधित क्षेत्रफळाचे सतरा फुट उंचीचे बांधकाम करण्यास परवानगी दिली जाते अथवा उपलब्धतेनुसार प्रभागांतर्गत किंवा इतरत्र पर्यायी सदनिका (PAP Tenements) दिल्या जातात अथवा बाधित बांधकामधारकांना आर्थिक ऐच्छिक मोबदला दिला जातो. बाधितांच्या पुनर्वसनास अनुसरून सद्य:स्थितीत सदर रस्ता रुंदीकरणात ४३२ बांधकामे बाधित होत असल्याने बांधकामधारकांनी जमा केलेल्या कागदपत्रांची छाननी, पडताळणी व सुनावणीच्या सोयीसाठी टप्पेनिहाय विभागणी केली असून त्याअनुषंगाने तयार करण्यात आलेले मसुदा परिशिष्ट II टप्प्यानुसार प्रदर्शित करण्यात येईल.  सदर बाबतीत १९१ बाधीत बांधकामधारकांचे परिशिष्ट-२ तयार करण्यात आले असून ते प्रदर्शित करण्यात आले आहे. उर्वरित बांधकामधारकांच्या कागदपत्रांच्या पडताळणीबाबत संबंधित विभागाकडून अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर उर्वरित बाधित बांधकामधारकांचे मसुदा परिशिष्ट-II टप्प्यानुसार तयार करून प्रदर्शित करण्यात येईल व रस्ता रुंदीकरणाची पुढील प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला महानगरपालिकेची पाणीपट्टी वसुलीसाठी अभय योजना राबविण्याबाबत

**(२२) १५१५ (२५-०४-२०२५). श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला महानगरपालिकेची पाणीपट्टी वसुली प्रकरण अदयापी निकाली निघाले नसल्याचे नुकतेच माहे जाने, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या सहा वर्षामध्ये चार वेळा पाणीपट्टी वसुलीसाठी खाजगी कंत्राटदार बदलण्यात आले असून चार कंत्राटदारांपैकी कोणीही नागरिकांना वेळेवर, व्यवस्थित व अचूक देयके दिली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आतापर्यंत जी काही देयके नागरकिांना देण्यात आली ती मनमानी पध्दतीने देण्यात आली असून कुणाला एक वर्षाचे, कुणाला दोन वर्षाचे तर कुणाला मीटर लावल्यापासून अशा मनमानी पध्दतीने देयके देण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात ठोस निर्णय घेऊन मागील सहा वर्षाच्या थकीत पाणीपट्टीसाठी प्रति नळ कनेक्शनसाठी प्रति वर्ष १००० रुपये प्रमाणे पाणीपट्टी आकारुन नागरिकांकडून पाणीपट्टी देयके घेऊन सदर पाणीपट्टी प्रकरण निकाली काढण्याबाबत मा. मुख्यमंत्र्यांकडे श्री. निलेश देव यांनी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याकरिता पाणीपट्टी अभय योजना राबविण्याबाबत प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०३-२०२६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

अकोला शहरामध्ये सद्यस्थितीत एकूण नळधारकांची संख्या ७००६५ आहे. त्यापैकी दिनांक ०१.०४.२०२५ ते दिनांक ३१.०७.२०२५ या कालावधीमध्ये एकूण देयके अदा केलेल्यांची संख्या ४२७६ असून देयके अदा न केलेल्यांची संख्या ६५७८९ नाही.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.

पाणीपट्टीची वसुली अत्यल्प असल्याने बाहय यंत्रणेव्दारा विशेष पाणीपट्टी कर वसुलीकरीता महानगरपालिकेमार्फत निविदा प्रक्रिया राबवून गणेश इंजिनिअर्स, नागपुर यांना आदेश क्र. ६४, दिनांक

०३.०९.२०१६ अन्वये, सौ. जे. एस. भालदार, मु.पो. येळावी, जि. सांगली यांना आदेश क्र. २३, दिनांक ०८.१०.२०२० अन्वये, में. वर्क ग्रुप सुशिक्षित बेरोजगार नागरी सेवा सहकारी संस्था, अमरावती यांना आदेश क्र. २८, दिनांक १५.०९.२०२१ अन्वये व मे. स्वाती इंडस्ट्रीज, रांची यांना आदेश क्र. ४७, दिनांक ०२.०८.२०२३ अन्वये कार्यादेश देण्यात आले आहेत. सदर यंत्रणेतर्फे नियमानुसार मिटर असलेल्या ग्राहकांना प्रत्यक्ष वापरानुसार रिडींग प्रमाणे व मिटर नसलेल्या ग्राहकांना नो मिटर प्रमाणे देयकाचे वितरण करण्यात आले आहे.

सद्यस्थितीत मे. स्वाती इंडस्ट्रीज यांचे आदेश दिनांक ३१.१२.२०२४ पासून रद्द करण्यात आली असून महानगरपालिकेमार्फत विशेष पाणीपट्टी कर वसुलीचे नियोजन करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

नागरीकांनी उशिरा भरलेल्या देयकाची नोंद न झाल्याने किवा नागरीकांनी देयके वेळेत न भरल्याने मागील थकबाकी नवीन देयकांमध्ये समाविष्ट होऊन येत असल्याने तसेच काही ठिकाणी मिटर बसविण्यात न आल्यामुळे सदरच्या अडचणी उद्भवल्या होत्या. परंतु अशा देयकांची तपासणी करुन त्यामध्ये तात्काळ दुरुस्ती करुन सुधारित देयके देण्यात आली आहेत.

(४) होय, हे खरे आहे. सदर पत्र आवश्यक कार्यवाहीस्तव आयुक्त, अकोला महानगरपालिका यांना पाठविण्यात आले आहे.

(५) पाणीपट्टी अभय योजना राबविण्याबाबत अकोला महानगरपालिकेतर्फे कोणताही प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नसल्याने त्याबाबत कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त करण्याबाबत

**(२३) १५३३ (२५-०४-२०२५). श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात महानगरपालिका व नागपूर सुधार प्रन्यास प्राधिकरण या दोन अधिकार संस्था कार्यरत असल्याने प्रशासनाला अंमलबजावणी करताना क्लिष्टता येत असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक सक्षम करण्याचे धोरण पंचायत राज विधेयकांमध्ये असल्याने प्राधिकरणामुळे लोकप्रतिनिधींच्या अधिकारांवर मर्यादा येत असून प्रशासकीय कामात अडचणी येत असल्याची बाब वारंवार निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरात २ विकास संस्था कार्यरत असल्याने विकास कामे करताना नोडल एजंसी ठरवण्यात अडचणी येणे तसेच डूप्लीकेशन ऑफ वर्क होणे यामुळे निधी खर्च करण्यात अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरात महानगरपालिका व NMRDA क्षेत्रात एनआयटीची प्राधिकारी संस्था अशी विभागणी करून सदर प्रश्न सोडवण्याबाबत लोकप्रतिनिधीनी लेखी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, शासन सदर क्लिष्टता संपून एनआयटी बरखास्त करणे अथवा महापालिका क्षेत्राबाहेरील कार्यक्षेत्र निश्चित करण्यबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०२-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.

नागपूर शहरात नागपूर महानगरपालिका ,नागपूर सुधार प्रन्यास व शहराबाहेरील क्षेत्राकरीता नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (NMRDA) नियोजन प्राधिकरण कार्यरत आहेत.

नागपूर सुधार प्रन्यास व नागपूर महानगरपालिका हे त्यांचे कार्य त्यांच्या संबंधित अधिनियमांनुसार करत आहे. शासनाने नागपूर सुधार प्रन्यासला दिनांक २७ फेब्रुवारी, २००२ व दिनांक ०९ एप्रिल, २०२१ च्या

अधिसूचनेद्वारे नागपूर महानगरपालिकाला क्षेत्रातील वेगवेगळे योजनांचे अधिकार प्रदान केलेले आहेत. त्यानुसार दोन्हीही प्राधिकरण हे नागपूर शहराच्या नियोजनबद्ध पध्दतीने विकास करण्याकरिता स्वतंत्रपणे कार्य करीत आहे. त्यामुळे कामाची द्विरुक्ती (Duplication of work) होण्याची शक्यता नाही. नागपूर सुधार प्रन्यास ही स्वायत्त संस्था असून, या संस्थेच्या आस्थापनाविषयक व अनुषांगिक खर्चासाठी शासनाकडून कोणताही निधी दिला जात नाही.

(३) व (४) लोकप्रतिनिधींद्वारे महानगरपालिका आणि शहर हद्दवाढ क्षेत्रात म्हणजेच NMRDA क्षेत्रात एनआयटीची प्राधिकारी संस्था अशी विभागणी करण्याबाबत मागणी प्राप्त नाही.

राज्य शासनाने दिनांक ०९ सप्टेंबर, २०१९ रोजी नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर ही संस्था "तत्वत: बरखास्त करण्यासंदर्भात" अध्यादेश प्रख्यापित केला होता. तथापि, मा. उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क.६८/२०१८ च्या सुनावणीदरम्यान सदर निर्णयाचा पुर्नविचार करण्यासंदर्भात दिनांक १० ऑक्टोबर, २०१८ अन्वये पारित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने अधिसूचना दिनांक ९ एप्रिल, २०२१ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासचे नियोजन प्राधिकरण म्हणून अधिकार पूर्ववत करण्यात आले. सदर अधिसूचनेत नमूद ७ योजनांकरीता नियोजन प्राधिकरण म्हणून नागपूर सुधार प्रन्यास कार्यरत आहे.

५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील कुर्ला (पश्चिम) येथील आगीत गोदामे जळून गेल्याबाबत

**(२४) १५६४ (०१-०५-२०२५). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कुर्ला (पश्चिम) येथील साकीनाका, खैरानी रोड येथील वाजीदअली कंपाऊंड परिसरात भीषण आग लागून आठ ते दहा गोदामे जळून गेली असल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत गेल्या दोन वर्षात (२०२३, २०२४) १० हजार ३७० आगीच्या घटना घडल्याचे वास्तव समोर आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने आढावा घेऊन आग प्रतिबंधक कायदयाची कठोर अंमलबजावणी करुन वाढत्या आगीच्या घटनांना रोखण्याच्यादृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

मुंबईत गेल्या दोन वर्षात अनुक्रमे सन २०२३ (०१.०१.२०२३) ते (३१.१२.२०२३) - एकूण आगीच्या घटना-५०७४ व सन २०२४ (०१.०१.२०२४) ते (३१.१२.२०२४)-एकूण आगीच्या घटना ५३०१ अशा एकूण १०३७५ आगीच्या घटना घडलेल्या आहेत.

(३) सद्य:स्थितीत मुंबई अग्निशमन दलाच्या सहा प्रादेशिक समादेश केंद्रानुसार त्यांच्या प्रत्येकी परिक्षेत्रमध्ये इमारतीच्या उंची व इमारतीच्या निवासी / अनिवासी प्रकाराप्रमाणे वरिष्ठ केंद्र अधिकारी-सहाय्यक विभागीय अग्निशमन अधिकारी, विभागीय अग्निशमन अधिकारी- उपप्रमुख अग्निशमन अधिकारी यांच्याद्वारे दर महिन्याला यादुच्छिक (RANDOM) तपासणी करण्यात येते.

ज्या इमारती/ आस्थापनाच्या स्थापित अग्नि प्रतिबंधक व अग्निसुरक्षा यंत्रणेमध्ये त्रुटी आढळल्यास संबंधित इमारतीचे मालक / भोगवटादार / आस्थापना /व्यवस्थापन / गृहनिर्माण संस्था यांना महाराष्ट्र अग्नि प्रतिबंधक व जीवनसुरक्षा अधिनियम २००६ नुसार कलम ६ व नियम ९ (१) अन्वये नोटीस बजावून मर्यादित विहित कालावधीमध्ये त्यांची पूर्तता करण्याकरिता कळविण्यात येते.

सदर इमारती / आस्थापनांनी जर मर्यादित विहित कालावधीमध्ये पूर्तता केली नसल्याचे आढळल्यास संबधितांवर आरोपपत्र (Offence Sheet) दाखल करण्यात येऊन सदर प्रकरण माननीय मुख्य महानगर दंडधिकारी न्यायालयात दाखल करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विधी विभागामार्फत अभियोग (Prosecution) दाखल केला जातो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक शहरातील नागरिकांना करोना काळात महापालिकेतील निधन झालेले अधिकारी व कर्मचारी यांचा वारसाना ५० लाखांची मदत मिळण्याबाबत

**(२५) १७२८ (०१-०५-२०२५). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात करोना महामारीच्या तीन लाटांमध्ये नाशिक शहरातील नागरिकांना विविध सेवा देतांना महापालिकेतील अनेक अधिकारी, कर्मचा-यांना जीव गमवावा लागला त्यातील ३७ दिवंगत अधिकारी व कर्मचा-यांपैकी ३० करोना योद्यांच्या वारसांना ५० लाखांच्या मदतीपासून वंचित रहावे लागल्याचे माहे जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करोना योद्यांच्या वारसांना मदत करण्यासाठी स्थापन करण्यात येणाऱ्या समितीची अद्यापही स्थापना झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०२६) :** (१), (२) व (३) नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोविड १९ संबंधित कर्तव्य बजावतांना कोविडचा संसर्ग होऊन कोविडमुळे मृत्यू झालेल्या एकुण ३७ पैकी ०६ अधिकारी / कर्मचारी यांना शासनामार्फत र.रु.५० लक्ष सानुग्रह सहाय्य अनुदान योजनाचा लाभ देण्यात आलेला आहे. नाशिक महानगरपालिका आयुक्त यांनी र.रु.५० लक्ष सानुग्रह सहाय्याची योजना लागु करणेकामी दिनांक ३०.१२.२०२२ अन्वये आयुक्त नाशिक महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यांची समिती गठीत करण्यात आली आहे.

त्यानुसार सदर समितीच्या समोर ३१ प्रस्ताव ठेवण्यात आले. त्यापैकी १ प्रस्ताव नाकारण्यात आला व उर्वरित ११ अधिकारी / कर्मचारी यांच्या परिपूर्ण प्रस्तांवाना मान्यता देण्यात आलेली आहे. उर्वरित १९ प्रस्तावांमध्ये कागदपत्रांची अपुर्तता असल्याने कागदपत्रे पुर्ततेची कार्यवाही सुरु आहे. समितीने मान्य केलेल्या प्रस्तावांना सन २०२५-२६ चा अर्थसंकल्प र.रु ५०० लक्षची तरतुद मंजुर करण्यात आलेली आहे. मंजुर प्रस्तावा नुसार र. रु.५० लक्ष आर्थिक सहाय्य देणे बाबतची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बोरिवली पूर्व येथील रहेजा रिफलेक्शन ते संपूर्ण ठाकूर व्हिलेज परिसरात अनधिकृत फेरीवाल्यांमुळे वाहतूक कोंडी होत असल्याबाबत

**(२६) १७९१ (०१-०५-२०२५). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरिवली पूर्व येथील रहेजा रिफलेक्शन ते संपूर्ण ठाकूर व्हिलेज परिसरात अनधिकृत फेरीवाल्यामुळे नागरिकांना तसेच वाहनांना वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत असल्याने शासनाने एक भूखंड उपलब्ध करुन हॉकर्स झोन निर्माण करण्याची तसेच सदर ठिकाणी ना फेरीवाला झोन निर्माण करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान संबधित विभागाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे,

कांदिवली (पूर्व) ठाकुर व्हिलेज परिसरातील अनधिकृत फेरीवाल्यांवर नियमित म.न.पा. अधिनियम ३१४ (क) अन्वये अतिक्रमण निमुर्लनाची कारवाई करण्यात येते व अनधिकृत फेरीवाल्याचा माल जप्त करण्यात येतो. ठाकुर व्हिलेज परिसरातील समता नगर बस डेपो ते दत्तानी पार्क रोड व १२० फुट रोड ते जानुपाडा जंक्शन असे दोन ठिकाणी फेरीवाला क्षेत्र (Hawking Zone) म्हणून घोषित करण्यात आलेला आहे.

ठाकुर व्हिलेज परिसरातील फेरीवाल्यांना बसण्यासाठी भुखंड उपलब्ध करुन देण्याचे धोरण नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील पवई येथील चांदिवली म्हाडा वसाहतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(२७) १८०३ (२३-०४-२०२५). श्री.दिलीप लांडे (चांदिवली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पवई येथील चांदिवली म्हाडा वसाहतीची दुरवस्था झाल्याचे माहे जाने, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त इमारतीमध्ये पावसाळयात मोठया प्रमाणात गळती होत असून अनेक ठिकाणी तडे गेलेले आहे, प्लॅास्टर निघालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार येत्या पावसाळयापूर्वी मुंबई शहराप्रमाणे उपनगरामधील म्हाडा तर्फे बांधण्यात आलेल्या वसाहतीची संपूर्ण पाहणी करुन त्यांच्या दुरुस्तीकरिता निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०३-२०२६) :** (१), (२) व (३) होय,हे अंशत: खरे आहे.

पवई येथील चांदिवली म्हाडा वसाहतीतील काही इमारतींची दुरवस्था झालेली आहे. तथापि मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत बांधण्यात आलेल्या इमारतीतील सदनिका मालकी तत्वावर वाटपानंतर सदर रहिवाश्यांनी गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत केल्यानंतर सदर इमारत हस्तांतरण करण्यात येते. तद्नंतर सदर इमारतीची दुरूस्ती व देखभाल करण्याची जबाबदारी सदर गृहनिर्माण संस्थेची आहे.

त्याअनुषंगाने चांदिवली येथील बांधण्यात आलेल्या इमारती तेथील सहकारी गृहनिर्माण संस्थांना हस्तांतरीत करण्यात आलेल्या आहेत. तसेच ५ इमारतींचे पोलीस विभागास व ४ इमारतींचे बेस्ट विभागास

वितरण करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर इमारतींची दुरूस्ती व देखभाल करण्याची जबाबदारी संबंधितांची (सहकारी गृहनिर्माण संस्था व संबंधित विभाग ) आहे.
(४) लागू नाही.

---

## राज्याच्या वित्त विभागात अधिनस्त येणाऱ्या बिगर आदिवासींना अधिसंख्य केलेल्या कर्मचाऱ्यांची पदे विनाविलंब भरण्याबाबत

**(२८) १८०५ (२६-०४-२०२५). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या वित्त विभागात अधिनस्त येणाऱ्या वस्तु व सेवा कर विभाग, लेखा व कोषागरे, स्थानिक निधी, लेखा व विमा संचालनालय या क्षेत्रीय कार्यालयात एकूण २०,३५३ पदे मंजूर आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मंजूर पदांपैकी १३७८ पदांतील अनुसूचित जमातीची ९६० पदे भरलेली असून त्यातील ८०८ जातवैधता प्रमाणपत्र सादर केली, परंतु राखीव जागेवर नियुक्ती झालेल्या अनुसूचित जमातीच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी जातवैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे अधिसंख्य पदावर सेवा अधिकारी-कर्मचाऱ्यांची संख्या १५६ तर रिक्त झालेल्या पदांची संख्या ४१ असल्याचे माहिती अधिकारांतर्गत दाखविण्यात आल्याचे दिनांक १६ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन बिगर आदिवासींना अधिसंख्य केलेल्या कर्मचाऱ्यांची पदे विनाविलंब भरण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०३-२०२६) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

राज्याच्या वित्त विभागाच्या अधिनस्त येणाऱ्या वस्तू व सेवा कर विभागात एकूण १२,२५९ पदे, लेखा व कोषागारे संचालनालयात ६,९१४ पदे, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयात १,४२० पदे व विमा संचालनालयात १२६ पदे अशी एकूण २०,७१९ पदे आकृतीबंधानुसार मंजूर आहेत.
(२) होय, अंशत: खरे आहे.

राज्याच्या वित्त विभागात अधिनस्त येणाऱ्या वस्तु व सेवा कर विभाग, लेखा व कोषागारे, स्थानिक निधी, लेखा व विमा संचालनालय या क्षेत्रीय कार्यालयात एकूण मंजूर २०,७१९ पदांपैकी ९४७ पदे अनुसूचित जमातीकरिता मंजूर असून त्यापैकी ६२६ पदे कार्यरत (भरलेली) आहेत. कार्यरत ६२६ अधिकारी/ कर्मचाऱ्यांपैकी एकूण ४९० अधिकारी/कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले असून उर्वरित १३६ अधिकारी/ कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही.
(३) हे खरे नाही.

दिनांक १६ डिसेंबर, २०२४ व त्यासुमारास अनुसुचित जमाती प्रवर्गातील अधिसंख्य पदांबाबत माहिती अधिकारांतर्गतचा अर्ज विभागास प्राप्त झाल्याचे कार्यालयीन अभिलेखातून आढळून आलेले नाही. अनुसूचित जमाती प्रवर्गातून नियुक्ती झालेल्या तथापि, जात प्रमाणपत्र सादर करु न शकलेल्या एकूण १४५ अधिकारी/कर्मचाऱ्यांकरिता अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आलेली असून त्यापैकी १७ पदे रिक्त झाली आहेत.
(४) व (५) राज्याच्या वित्त विभागाच्या अधिनस्त येणाऱ्या वस्तु व सेवा कर विभाग, लेखा व कोषागारे, स्थानिक निधी, लेखा व विमा संचालनालय या क्षेत्रीय कार्यालयातील अनुसूचित जमाती प्रवर्गातील उपलब्ध

असलेली सर्व रिक्त पदे भरण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

## नाशिक महानगरपालिका अंतर्गत डांबरीकरणाच्या कामाचे नियमित गुणवत्ता परीक्षण करणे बाबत

**(२९) १९०३ (२३-०४-२०२५). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिका अंतर्गत डांबरीकरणाची कामे दर्जेदार होण्यासाठी व खड्डे मुक्त नाशिक होण्यासाठी गुणवत्ता नियंत्रण विभाग आयुक्तांनी आपल्या नियंत्रणाखाली घ्यावा व नाशिक शहरातील रस्त्यांचे व त्यासाठी वापरल्या जाणाऱ्या डांबराचे नियमित परीक्षण व्हावे अशी मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाशिक महानगरपालिकेतील गुणनियंत्रण विभाग हा महानगरपालिका आदेश दिनांक ०१/०१/२०२१ व आदेश दिनांक १६.०४.२०२५ अन्वये आयुक्तांच्या थेट नियंत्रणाखाली आहे

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक महानगरपालिका अंतर्गत प्रसिद्ध केलेली निविदा क्रमांक १६ रद्द करण्याची होत असलेली मागणी

**(३०) १९०४ (०१-०५-२०२५). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिका अंतर्गत निविदा क्रमांक १६ प्रसिद्ध करताना शहर अभियंता यांना जिओ टॅपिंग देणे, परिपूर्ण अंदाजपत्रक तयार न करणे यासह अनेक चुका असल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार असल्यामुळे सदर निविदा रद्द करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शहारातील रस्त्यांमध्ये असलेल्या विविध सार्वजनिक सुविधा जसे की मलवाहिका, जलवाहिका, विद्युतवाहिका, गॅस पाईपलाईन, विद्युतखांब, पावसाळी पाण्याच्या पाईपलाईन, चेंबर्स, मलवाहिका ढापे, पाणी पुरवठ्याचे व्हाल्व, अतिक्रमीत/ अनधिकृत बांधकामे अशा अनेक बाबींमुळे कामांमध्ये अनेक अडचणी येत असतात व त्यामुळे ठेकेदारांमार्फत काम सुरु केल्यानंतर विविध कारणे देऊन कामास वारंवार मुदतवाढ, अतिरिक्त खर्चाची मागणी व प्रसंगी न्यायालयीन वाद उपस्थित केले जातात. त्यामुळे निविदा दाखल करण्यापुर्वी प्रस्तावित कामाची प्रत्यक्ष पाहणी होण्याच्या दृष्टीकोनातून जलसंपदा विभाग, शासन निर्णय दिनांक १८/१०/२०२३ अन्वये

जिओ टॅगींगची अट टाकण्यात आली होती. तथापी मक्तेदार संघटना व काही मक्तेदार यांच्या तीव्र मागणीस अनुसरून खुली स्पर्धा होणेच्या दृष्टीकोनातून महानगरपालिकेकडून सदरची अट रद्द करण्यात आली आहे.

नाशिक महानगरपालिका हद्दी मध्ये अस्तीत्वातील रस्ते रुंदीकरण करणे व अस्तरीकरण करणेच्या कामांच्या प्राकलना मध्ये रोड साईड फर्निचरच्या बाबी अंतर्भुत करण्यात येत नाही. तथापी नवीन रस्ते विकास कामे करतांना रोड साईड फर्निचरच्या बाबी तसेच पावसाळी पाण्याचा निचरा होणेकामी पर्जन्य वाहिनी व इतर आवश्यक बाबी प्राकलनामध्ये घेण्यात येतात. तरी यापुढे रस्ते बांधकाम कामाचे प्राकलन तयार करतांना त्रुटी राहणार नाही याची महानगरपालिका तर्फे दक्षता घेण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंपळे गुरव (जि.पुणे) येथील पवना नदीपात्रात बांधकामाचा राडारोडा टाकण्यात येत असल्याबाबत**

**(३१) २१५५ (०१-०५-२०२५). श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळे गुरव (जि.पुणे) येथील पवना नदीपात्रात दगड धोंडे मातीचा भराव आणि बांधकामाचा राडारोडा (डेब्रिज) टाकून नदीचे पात्र बुजविण्यात आल्याचे माहे डिसेंबर २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नदी सुधार प्रकल्प अंतर्गत नदीपात्र सखोल मोठे विस्तृत व्हायला हवे जेणेकरून भविष्यात उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तीचा धोका टाळता यावा परंतु अशाप्रकारे नदीपात्रातच राडारोडा टाकून प्रवाहाला अडथळा निर्माण केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत सखोल चौकशी करण्यात येऊन नदीपात्रा राडाराडा टाकणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली तसेचनदी सुधार प्रकल्प त्वरित सुरू करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०३-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) पिंपरी चिंचवड मनपाहद्दीतील नदीप्रदूषणास कारणीभूत असणाऱ्या आस्थापना व नागरिकांवर मनपामार्फत २ उपद्रव शोध पथक सन २०२१ मध्ये स्थापन करण्यात आले आहे. त्यांचेमार्फत तपासणी करुन तपासणी अंती दोषी आढळणाऱ्यावर कारवाई करण्यात येत असून अद्यापर्यंत नदीपात्रात भराव केले प्रकरणी दोषी आढळलेल्या ८ ठिकाणचे जागामालकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच वेळोवेळी कारवाई करुन ट्रक्टर/डम्पर/ट्रक यांसारखी वाहनांवर दंडात्मक कारवाई करुन अद्यापपर्यंत ६०.८७ लक्ष इतका दंड मनपा कोषागारात भरुन घेणेत आला आहे. यापैकी पवना नदीच्या भागात ४ फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत व अद्यापपर्यंत १८.३१ लक्ष इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई व उपनगरातील जुन्या व जीर्ण उपकरप्राप्त इमारतींचे पुनर्विकास करण्याबाबत

**(३२) २३६३ (०१-०५-२०२५). श्री.महेश सावंत (माहिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर तसेच शहरातील जुन्या व जीर्ण उपकरप्राप्त इमारती असून त्या मोडकळीस आल्या असल्याने इमारतींमध्ये वारंवार अपघात घडून जीवित अथवा वित्त हानी होण्याच्या घटना घडत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धोकादायक इमारतीतील रहिवाश्यांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार म्हाडा अधिका-यांकडे या संदर्भात तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इमातीचे पुनर्वसन गत आठ-दहा वर्षापासून प्रलंबित असल्याने इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाश्यांना आपला जीव मुठीत घेऊन राहावे लागत असून अनेक विकासकांनी आर्थिक अडचण असल्याचे कारण देत पुनर्विकास प्रकल्प प्रलंबित असल्याची कारणे दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जीर्ण झालेल्या इमारतीचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०४-२०२६) :** (१) ते (४) होय, अंशत: खरे आहे.

मुंबई शहरातील धोकादायक, जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त इमारतींचा पुनर्विकास जलद गतीने होण्यासाठी म्हाड अधिनियम, १९७६ मध्ये दि.०२.१२.२०२२ रोजी नवीन कलम ७९ (अ) व ९१ (अ) अंतर्भूत करण्यात आले आहे. सदर कलम ७९ (अ) नुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने अथवा सक्षम प्राधिकाऱ्याने मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारत धोकादायक घोषित केल्यानंतर संबंधित इमारतीच्या मालकास सर्वप्रथम तदनंतर इमारतीच्या भाडेकरुंच्या नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेस इमारतीच्या पुनर्विकासाची कालबद्ध संधी देण्याची तरतूद आहे. त्यांनी देखील विहित कालमर्यादेत पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर न केल्यास अशा इमारतींचे भूसंपादन करुन पुनर्विकास म्हाडा / मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत करण्याची तरतूद केली आहे.

तसेच, म्हाड अधिनियम १९७६ मधील नवीन कलम ९१(अ) नुसार उपकर प्राप्त इमारतींचे रखडलेले / अधर्वट अवस्थेत सोडलेले पुनर्विकास प्रकल्प म्हाडामार्फत ताब्यात घेऊन पुनर्विकास करण्याची तरतूद आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती महानगरपालिकेच्या इमारतीच्या जागेवर अत्याधुनिक व सुसज्ज बांधकाम करण्याबाबत

**(३३) २४७४ (२७-०४-२०२५). श्री.रवी राणा (बडनेरा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिका इमारतीच्या धर्तीवर अमरावती महानगरपालिका इमारतीच्या जागेवर अत्याधुनिक व सुसज्ज बांधकाम करण्याकरिता कामास मंजुरी द्यावी यासाठी उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांच्याकडे स्थानिक

लोकप्रतिनिधी दिनांक ०७ जानेवारी २०२५ रोजी वा त्यासुमारास मागणी केली असून त्याची प्रत आयुक्त तथा प्रशासन महानगरपालिका अमरावती यांना ही पाठवली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०४-२०२६) :** (१), (२), व (३) २०२५-२६ या वर्षाकरीता उपलब्ध होणारी आर्थिक तरतूद, विविध निधी मागणीचे प्रस्ताव, कामाचा प्राधान्यक्रम इत्यादी बाबी विचारात घेऊन निधी मंजूर करण्याची नियमोचित कार्यवाही करण्यात येते.

---

## उद्योगनगरी पिंपरी चिंचवड शहरातील फेरीवाल्यांना ओळखपत्र व प्रमाणपत्रात वितरित करण्यात होत असलेल्या दिरंगाईबाबत

**(३४) २६०८ (०१-०५-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने न्यायालयाच्या आदेशानुसार १ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर २०२२ या कालावधीत शहरातील फेरीवाले आणि पथविक्रेत्यांचे सर्वेक्षण केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेतील हद्दीतील फेरी विक्रेत्यांकडून एक हजार रुपये शुल्क आणि ओळखपत्र आणि विक्री प्रमाणपत्रासाठी प्रत्येकी दोनशे रुपये शुल्क आकारण्यात आले होते ,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरातील पंधरा हजार पेक्षा अधिक पात्र फेरीवाल्यांना दोन वर्षापेक्षा अधिक कालावधी उलटूनही अद्यापही ओळखपत्र व विक्री प्रमाणपत्र दिले नसल्याचे दिनांक २० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उद्योगनगरी पिंपरी चिंचवड शहरातील फेरीविक्रेत्यांना अधिकाऱ्यांचे डिजिटल स्वाक्षरीचे ओळखपत्र व प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक ०१/११/२०२२ ते दिनांक ०१/१०/२०२३ या कालावधीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पथविक्रेत्यांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे.
(२) होय, हे खरे आहे.

सर्वेक्षणात आढळलेल्या पथविक्रेत्यांकडून महापालिकेच्या क्षेत्रिय कार्यालयामध्ये पथविक्रेता नोंदणीसाठी र.रु.१००० ओळखपत्र शुल्क र.रु.२०० व प्रमाणपत्र शुल्क र.रु.२०० आकारुन प्रमाणपत्र व ओळखपत्र देण्यात येत आहे.
(३) हे खरे नाही.

सर्वेक्षणानंतर यादी प्रसिद्ध करुन सूचना हरकती मागविण्यात आल्या होत्या. दिनांक ०५/०८/२०२४ पासून शुल्क वसुल करुन ओळखपत्र व प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरु केली आहे.
(४) व (५) सर्वेक्षणामध्ये आढळलेल्या ज्या पथविक्रेत्यांनी शुल्क भरलेले आहे, अशा पथविक्रेत्यांना डिजिटल स्वाक्षरीचे ओळखपत्र व प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## महानगर पालिका सीबीएसई शाळेमध्ये २ कोटी पेक्षा जास्त रुपयांचे फर्निचर खरेदी केल्या बाबत

**(३५) २९०४ (०१-०५-२०२५). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने मुंबई शहर व उपनगरात राहणाऱ्या सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी अन्य मंडळाच्या अभ्यासक्रमाची शिक्षण घेण्याची संधी मिळावी याकरिता सन २०२०-२१ मध्ये सीबीएससी व आयसीएससी बोर्डाच्या शाळा सुरू केल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या मुंबईत १८ सीबीएससी, १ आयसीएससी, १ आईजीसीएससी व १ आयबी अशा २१ अन्य मंडळाच्या शाळा सुरू आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या शाळेसाठी मुंबई महानगरपालिकेने दोन कोटी पेक्षा जास्त रुपये किमतीचे फर्निचर चढया भावाने खरेदी करणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चढ्या भावाने खरेदी करण्यात येणाऱ्या फर्निचर खरेदी बाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु करण्यात आलेल्या अन्य मंडळाच्या शाळांना आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध होणाच्या दृष्टीने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रचलित पध्दतीनुसार शासनाच्या महाटेंडर या संकेतस्थळावर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. त्यानुसार ४ निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यातील लघुत्तम निविदेनुसार रु.१ कोटी ९८ लक्ष ४ हजार ४७२ इतक्या रकमेचे खरेदी आदेश देण्यात आले आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बहुळा मध्यम प्रकल्प नदीजोड योजनेअंतर्गत निधी मंजूर होऊन मिळण्याबाबत

**(३६) ३०३२ (२७-०४-२०२५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा-भडगांव (जि. जळगाव) येथील खडकदेवळा धरण ते सुकळेश्वर पाझर तलाव यामध्ये बहुळा मध्यम प्रकल्प हा नदीजोड योजनेअंतर्गत मंजूर होऊन त्यास निधी मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, यांच्याकडे माहे जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (०६-०३-२०२६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हिवरा (खडकदेवळा) मध्यम प्रकल्प हा मौजे खडकदेवळा, ता. पाचोरा, जि. जळगांव या गावाजवळ हिवरा नदीवर बांधण्यात आलेला आहे. हिवरा नदी गिरणा नदीची प्रमुख उपनदी आहे.

मा. लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावरील प्राथमिक पाहणी व टोपोशिटच्या

अभ्यासानुसार सुकळेश्वर पाझर तलाव हा बहुळा मध्यम प्रकल्पाच्या वरील बाजूस आहे. हिवरा (खडकदेवळा) धरण हे बहुळा प्रकल्पाच्या शेजारील पाणलोट क्षेत्रात आहे. त्यामुळे प्रवाही पध्दतीने हिवरा नदीपात्रातुन सुकळेश्वर पाझर तलावात पाणी सोडणे शक्य होणार नाही.

सुकळेश्वर पाझर तलावाची एकूण साठवण क्षमता अल्प (०.२४ दलघमी) असून अप्रत्यक्ष सिंचन क्षमता ५१ हे. आहे. त्यामुळे सुकळेश्वर तलावाच्या वरील बाजूस असलेल्या शेवाळेवाडी, निंभोरी तांडा, वाणेगाव, मोढाळे, डोंगरगाव या गावांना सिंचनाचा लाभ देणे शक्य नाही. बहुळा मध्यम प्रकल्पामध्ये मागील ५ वर्षात सरासरी ९५% पेक्षा जास्त पाणीसाठा झालेला आहे. तसेच मा. लोकप्रतिनिधींनी सिंचनाची मागणी केलेली गावे हि बहुळा प्रकल्प व सुकळेश्वर पाझर तलावाच्या वरील बाजूस येतात.

उपरोक्त बाबींचा विचार करता हिवरा नदीपात्रातुन सुकळेश्वर पाझर तलावात पाणी टाकणे शक्य होणार नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## श्रीक्षेत्र माहूर नगरीचा व माहूर गडाचा एकाच वेळी सर्वंकष आराखडा तयार करण्याबाबत

**(३७) ३२५८ (०८-०४-२०२५). श्री.भीमराव केराम (किनवट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्यातील माहूरच्या किल्ल्यावर ट्रेकिंग व इको गार्डनचा प्रस्ताव प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रीक्षेत्र माहूर नगरीचा व माहूर गडाचा एकाच वेळी सर्वंकष आराखडा तयार करून पर्यटनाला चालना मिळेल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी करुन तीर्थक्षेत्र व पर्यटनाच्या दृष्टिकोनातून माहूर गडाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

श्री क्षेत्र माहूरगड, जिल्हा नांदेड पर्यटनस्थळ विकासाच्या आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही नियोजन विभागामार्फत सुरु आहे. यामध्ये ट्रेकिंग व इको गार्डनच्या प्रस्तावाचा समावेश नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

नियोजन विभागाच्या शासन निर्णयातील धोरणात्माक तरतूदींनूसार श्रीक्षेत्र माहूरगड, जिल्हा नांदेड पर्यटनस्थळ विकास आराखड्यात तीर्थक्षेत्राचा विकास अपेक्षित आहे. पूर्ण नगराच्या विकास कामांचा समावेश अपेक्षित नाही.

(३) दिनांक ०६/०५/२०२५ रोजी मौ.चौंडी, ता. जामखेड, जिल्हा अहिल्यानगर येथे मंत्रिपरिषदेची बैठकीमध्ये श्रीक्षेत्र माहूरगड, जिल्हा नांदेड पर्यटनस्थळ विकासाच्या आराखड्यास तत्वत: मान्यता प्राप्त झाली आहे. सद्यस्थितीत दोनवेळा उच्च्चाधिकार समितीच्या बैठका संपन्न झाल्या असून जिल्हाधिकारी, नांदेड यांचेकडून सुधारित प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर उच्चाधिकार समितीच्या मान्यतेने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### कुकडी प्रकल्पाची (ता.करमाळा, जि.सोलापूर) अनेक कामे प्रलंबित असल्याबाबत

**(३८) ३३१८ (०१-०५-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुकडी प्रकल्पाची (ता.करमाळा, जि.सोलापूर) अनेक कामे प्रलंबित असून प्रकल्पाच्या चारीची व विमोचकाची कामे सुरू असून सदर प्रकल्पासाठी जवळपास १००५ हेक्टर खाजगी जमीन संपादित केले आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्प बाधित शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत भूसंपादनाची कोणतीही रक्कम दिली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, संपादित जमिनधारक शेतकऱ्यांना मोबदला तसेच कालवा खोदाई व अस्तरीकरणाच्या अपूर्ण कामे करण्यासाठी जवळपास ६० कोटी रु. इतक्या निधीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्र्यांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, कुकडी प्रकल्पाची करमाळा तालुक्यातील उर्वरित अपूर्ण कामे मुदतीत पूर्ण करण्याबाबत तसेच संपादित जमिनधारक शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-०४-२०२६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

करमाळा तालुक्यातील मुख्य कालवा / शाखा कालवा/वितरीका/लघु वितरिकांच्या भूसंपादनासाठी एकूण १२३३.९३ हेक्टर क्षेत्रापैकी ३२३.३२ हेक्टर क्षेत्राचा मोबदला रु. ४९.३७ कोटी अदा करुन संपादित केली आहे. उर्वरित ९१०.६१ क्षेत्रापैकी जिल्हाधिकारी सोलापूर यांच्याकडे १९१.३५ हे. क्षेत्राचे १७ प्रस्ताव भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये व २७२.०९ हे. क्षेत्राचे ३६ प्रस्ताव सन २०१५ च्या शासन निर्णयान्वये सादर केले असून त्यापैकी २३१.७२ हे. क्षेत्राच्या २६ प्रस्तावांना जिल्हा मुल्यांकन समतीची मान्यता प्राप्त आहे. सदर भूसंपादनाची प्रक्रिया निधी उपलब्धतेनुसार सुरू आहे.

(३) अंशत: खरे आहे.

लोकप्रतिनिधी यांनी कुकडी प्रकल्पांतर्गत करमाळा तालुक्यातील भूसंपादनासाठी रु. ७० कोटी इतक्या निधीची तरतूद करणेबाबत मागणी केली आहे.

(४) कुकडी प्रकल्पाची करमाळा तालुक्यातील उर्वरित कामे मुदतीत पुर्ण करणेबाबत तसेच थेट खरेदीने संपादीत करावयाच्या क्षेत्राबाबत जमिनधारक शेतकऱ्यांना मोबदला अदा करण्याच्या प्रस्तावांवर क्षेत्रिय स्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मध्यान्ह भोजन योजनेतर्गत पुरवठा केला जाणारा अन्नपदार्थ हा निकृष्ट दर्जाचा असल्याबाबत

**(३९) ३३९६ (२७-०४-२०२५). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माध्यान्ह भोजन योजना ही राज्यातील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यास प्रोत्साहीत देण्यारी यासोबतच राज्यातील गोरगरीब व दुर्बल घटकांतील मुलांचे पोषण वाढवणारी योजना असून या योजनेंतर्गत पुरवठा केला जाणारा अन्नपदार्थ हा निकृष्ट दर्जाचा असल्याचे वेळोवेळी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील १२ शाळांना माध्यान्ह भोजन पुरवण्याचे कंत्राट ओम शक्ती महिला सहकारी संस्थेला देण्यात आले होते, मात्र संबंधित कंत्राटदारांकडून शाळांना निकृष्ट दर्जाचा

अन्नधान्य पुरवठा होत असल्याच्या तक्रारींची दखल घेवून महानगरपालिका प्रशासनाने ओम शक्ती महिला सहकारी संस्थेचे कंत्राट रद्द केले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या अन्नधान्याचा दर्जा तपासणीचे काम स्थानिक प्रशासनाने वारंवार नियमित व आकस्मिक भेट देवून तपासणी केली पाहीजे अशा सूचना न्यायालयाने दिल्या आहेत, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास , याबाबत शासनाने योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या अन्नधान्याचा दर्जा तपासणीचे काम स्थानिक प्रशासनाने नियमित करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०४-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील संबंधित शाळांकडून तक्रारी प्राप्त होताच सदर तक्रारीची दखल घेवून महानगरपालिका प्रशासनाने ओम शक्ती महिला सहकारी संस्थेचे कंत्राट दिनांक १४ मे, २०२४ रोजी रद्द करण्यात आले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) मिरा-भाईंदर महानगरपालिका प्रशासनाकडून शाळांना भेटी देवून आहाराचा दर्जा तपासणीचे काम नियमित करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उपराई ( जि. अमरावती) येथील पुर्णा नदीवर भालसी गावाला जोडण्याकरिता पुलाचे बांधकाम करण्याबाबत**

**(४०) ३४६६ (२९-०४-२०२५). श्री.गजानन लवटे (दर्यापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील उपराई आणि भातकुली तालुक्यातील भालसी या दोन्ही गावांच्या मधून वाहणाऱ्या पुर्णा नदीवर गावातील लोकांना जाण्या येण्यासाठी पूल बांधण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून या दोन्ही गावातील रहिवाशांनी मा. मुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री, .जिल्हाधिकारी, अमरावती, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग,जिल्हा परिषद, अमरावती,यांचेकडे करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच या नदीवर पूल नसल्याने गावकऱ्यांना अनेक वेळा जीव धोक्यात घालून नदीपात्रातून ये-जा करावी लागते व ५०-६० कि.मी. अंतरावरून वळण घेऊन यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पूल बांधण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी सुद्धा मा.मुख्यमंत्री व सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे दिनांक ३०/०१/२०२५ वा त्या सुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर ठिकाणी पूल बांधण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०१-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) होय, निवेदन प्राप्त आहे.

तथापि, पूर्णा नदीवर पूलाचे बांधकाम निधी, निकष व प्राधान्यक्रम नुसार हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

## मुंबईतील वरळी येथील सिध्दार्थनगर टेकडी येथील रहिवाशांना शौचालय उभारण्याबाबत

**(४१) ३५०४ (०१-०५-२०२५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वरळी येथील सिध्दार्थनगर टेकडी येथील रहिवाशांचे शौचालयाअभावी प्रचंड हाल होत असून, उघड्यावर शौचालयाला त्यांना जावे लागत असल्याचे दिनांक ०९.०४. २०२४ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिलांना सुरक्षेच्या दृष्टीने घातक असल्याने शौचास जाताना घरातील पुरुषांना सोबत घेवून जावे लागत आहे, हे खरं आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शौचालय उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) सदर बाबतीत बृहन्मुंबई महानगरपालिकेस कुठल्याही प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) सिद्धार्थनगर येथे एकूण ३ शौचालय उपलब्ध असून पुरुषांसाठी १४ व स्त्रियांसाठी १६ आसने असे एकूण ३० शौचकूप आसने उपलब्ध आहेत. सिद्धार्थनगर ही झोपडपट्टी वरळी जलाशयाच्या टेकडीवर वसलेली असून सदर ठिकाणी भौगोलिकदृष्टया अडचणींचा सामना करावा लागतो. सद्य:स्थितीत सिद्धार्थनगर येथे अधिकचे नवीन शौचालय उभारण्याकरीता शक्यता तपासण्याबाबतची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील खारघर-नेरूळ किनारा मार्गाचा प्रकल्प प्रलबित असल्याबाबत

**(४२) ३५४० (०१-०५-२०२५). श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विविध कारणांमुळे मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या मुंबईतील खारघर-नेरूळ किनारा मार्गाचा ११०० कोटी रुपये खर्चाचा प्रकल्प पुन्हा वादात सापडला असून प्रकल्पाच्या कामासाठी सिडकोने काढलेल्या निविदेवर उरण येथील लोकप्रतिनिधींनी आक्षेप घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडकोने भारतातील नामांकित कंत्राटदारांना नियमाबाह्य व जाचक अटी टाकून मर्जीतील ठेकेदारांना कंत्राट देण्याचा प्रयत्न सिडकोने केला असल्याची तक्रार लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्या अनुषंगाने दोषी असलेल्यांवर पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०७-२०२५) :** (१), (२), (३) व (४) खारघर ते नेरुळ दरम्यानच्या कोस्टल रोड संबंधीत निविदेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १८.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये आक्षेप घेतला आहे, हे खरे आहे.

खारघर ते नेरुळ प्रस्तावित कोस्टल रोड प्रकल्पांतर्गत खारघर परिक्षेत्रातून जाणाऱ्या सेक्टर १६ ते खारघर रेल्वेस्टेशन पर्यंतच्या रस्ते बांधणीसाठी ई-निविदा दिनांक २०.९.२०२४ अन्वये अंदाजित रु.१०९६ कोटी वाटप कामासाठी मागविण्यात आल्या होत्या. निकषांची पुस्तिका मार्च, २०१५" नुसार सर्वसाधारण निविदा काढण्यात येतात. त्यामध्ये रु.१०० कोटी व त्यापेक्षा जास्त कामांच्या बोलीसाठी संयुक्त उपक्रमास (JV/ Consortium) परवानगी देण्याची तरतूद आहे. तथापि, सदर काम मुख्यत्वे "ब्रीज वर्क व तत्सम" या एकाच प्रकारातील असल्याने एकल बोलीधारकांना तत्सम अनुभव आवश्यक असल्याने संयुक्त उपक्रमास (JV/ Consortium) उक्त प्रकल्पाच्या निविदेमध्ये परवानगी दिलेली नाही.

तसेच सदर कामाचे स्वरुप मुंबई महानगरपरिक्षेत्र Mumbai Metropolitan Region मधील कामांच्या स्वरुपास अनुरुप (जसे खाडी किनारा, कांदळवन क्षेत्र व दलदल इ.) असल्याने Mumbai Metropolitan Region मध्ये कामाचा अनुभव असणे ही बाब निविदेतील अटी व शर्ती मध्ये अंतर्भूत करण्यात आली आहे. सिडकोच्या बोली मुल्यमापन समितीच्या शिफारशीनुसार न्युनतम (L-१) निविदाधारक यांना काम प्रदान करण्याचा प्रस्तावास सिडको संचालक मंडळाने दिनांक ३.३.२०२५ रोजी मान्यता दिली आहे. त्यानुसार न्युनतम निविदाधारकास दिनांक २१.३.२०२५ रोजी स्विकृती पत्र प्रदान करण्यात आले आहे. सदर कामासाठी आवश्यक मा.उच्च न्यायालयाचे ना-हरकत पत्र व वन विभागाकडून कांदळवन तोडीची परवानगी मिळविण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## पुरंदर उपसा सिंचन योजनेबाबत

**(४३) ३७७२ (३०-०४-२०२५). श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभाग (जि. पुणे) अंतर्गत पुरंदर उपसा सिंचन योजनेत शेतकऱ्यांचे तलाव उघड्या पाटपाणी पद्धतीने भरून दिले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा पारंपारिक पद्धतीने पाणी सोडल्याने बाष्पीभवन, पाणीचोरी व गळती यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असल्याचे निदर्शनास आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाणी वाया जात असल्याने ते थांबविण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी सर्व तलावापर्यंत जलवाहिनी करण्याची व त्यास निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-०४-२०२६) :** (१) अंशतः खरे आहे.

पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रात प्रकल्पाचा अहवाल व अंमलबजावणीनुसार बंदीस्त वितरीकेतुन पाणी दिले जाते. तसेच जलसंपदा विभाग, शासन निर्णय दिनांक ०२ मे, २०१७ नुसार प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात सूक्ष्म सिंचनास शाश्वत पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी लघु पाटबंधारे तलाव, पाझर तलाव, गाव तलाव, बंधारे इत्यादी विकेंद्रीत जलसाठ्यात नैसर्गिक ओढ्यांतून पाणी भरून दिले जातात.

(२) अंशतः खरे आहे.

वितरिका/लघुवितरिका यावरील व्हॉल्व्हद्वारे जवळच्या ओढ्यांमध्ये पाणी सोडून लाभक्षेत्रातील तलाव

तसेच बंधारे भरून दिले जातात व त्या ठिकाणाहून पंप टाकून सिंचनासाठी शेतकरी पाणी घेत असतात. सदर ओढ्यातुन तलावापर्यंत पाणी पोहोचेपर्यंत काही प्रमाणात पाझर व बाष्पीभवन होते, तथापि मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात नाही.
(३) व (४) होय, हे खरे आहे.

पुणे जिल्ह्यातील बारामती व पुरंदर तालूक्यातील अटल भूजल योजनेत समाविष्ट असणाऱ्या गावांतील कामांना जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून त्यापैकी काही कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. उर्वरीत कामांची निविदा कार्यवाही निधी उपलब्धतेनुसार करण्याचे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबईत १५१२ संशयित क्षयरुग्ण आढळल्याबाबत

**(४४) ३८५८ (२३-०४-२०२५). श्री.कालिदास कोळंबकर (वडाळा), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई महापालिकेने सक्रीय क्षयरुग्ण शोध मोहीम हाती घेतली असून या मोहिमेदरम्यान शहरात एकूण १५१२ संशयित क्षयरुग्ण आढळून आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मोहिमेच्या माध्यमातून क्षयरोगाच्या निदाना अभावी अद्यापही उपचारापासून वंचित असणाऱ्या क्षयरुग्णांचा प्रशिक्षित पथकाद्वारे शोध घेऊन त्यांच्यावर औषधोपचार सुरु असल्याची माहिती माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर माहितीनुसार आतापर्यंत किती क्षयरुग्णांवर उपचार सुरु केले आहेत,

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०४-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) नवी मुंबई महानगरपालिकेद्वारे सक्रिय क्षयरोग शोध मोहिम दिनांक २३ डिसेंबर, २०२४ ते ०३ जानेवारी, २०२५ राबविण्यात आली. यामध्ये एकूण १५४५ संशयित क्षयरुग्ण आढळून आले. सदर संशयित रुग्णांची क्षयरोग तपासणी केली असता, संशयित रुग्णापैकी एकूण ४० रुग्णांना क्षयरुग्ण असल्याचे निदान झाले असून त्यापैकी ३१ क्षयरुग्ण बरे झाले असून ९ रुग्णांवर उपचार सुरू आहेत.

---

## कल्याण पूर्वेमधील एमएमआरडीए मार्फत सुरु असलेल्या डी पी रस्त्यांच्या कॉंक्रीटीकरणाचे काम डी पी नकाश्याप्रमाणे करण्याबाबत

**(४५) ४५३९ (०१-०५-२०२५). श्रीमती सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण पूर्वेमधील वाढती लोकसंख्या लक्षात घेता एमएमआरडीए मार्फत अनेक डी.पी रस्त्यांच्या कॉंक्रीटकरणाची कामे सुरु आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रस्त्यांची कामे डी.पी नकाश्याप्रमाणे होत नसून अस्तित्वात असलेल्या जागेनुसार काम सुरु आहेत, हेही खरे आहे काय,
(३) तसेच कल्याणमधील वाढते शहरीकरण लक्षात घेता याठिकाणी भविष्यात अरुंद रस्त्यांमुळे नागरिकांना मोठया प्रमाणावर वाहतूक कोंडीना सामोरे जावे लागणार आहे हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, एमएमआरडीए मार्फत सुरु असलेल्या डी पी रस्त्यांच्या कॉंक्रीटकरणाचे काम डी पी

नकाश्याप्रमाणे करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी मा.उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री ठाणे यांना दिनांक २९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्या दरम्यान पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन डी.पी नकाश्याप्रमाणे रस्त्यांच्याचे काम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०३-२०२६) :** (१) होय, खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या मागणीनुसार कल्याण पूर्व मध्ये मंजुर केलेल्या डिपी प्रमाणे अस्तित्वातील असलेल्या व नसलेल्या रस्त्यांचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत कॉंक्रीटीकरण करुन रस्ते बांधकाम करण्यात येत आहे.
(२), (३) व (४) कल्याण पूर्व भागातील रस्त्याचा विकास हा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमार्फत डि पी रोडच्या आरेखनानुसार कॉंक्रीटीकरणाची कामे प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहेत. सदर रस्ते हे विकास योजनेच्या रुंदीमध्ये अतिक्रमणाने बाधित आहे. कल्याण डोंबिवली महागरपालिकेमार्फत अतिक्रमण निष्कासनाची कार्यवाही प्रगतीपथावर असून विकास योजनेच्या आरेखनानुसार अतिक्रमण निष्कासन पुर्ण झाल्यावर प्राधिकरणामार्फत कॉंक्रीटीकरण रस्त्याचे बांधकाम करण्याचे नियोजित आहे. त्यामुळे भविष्यातील वाहतुक कोंडी कमी होण्यास मदत होईल.
(५) कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या विकास योजनेच्या आराखड्यानुसार ज्या रस्त्यांवरच्या लांबीमध्ये अतिक्रमण निष्काषित केले आहे त्या रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करण्याचे काम पुर्ण केले असून उर्वरित लांबीतील रस्त्यांवर असलेल्या अतिक्रमणाच्या निष्कासनाची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत पुर्ण झाल्यानंतर प्राधिकरणामार्फत विनाविलंब कामे पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

## नवी मुंबई महानगरपालिका व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामधील घरांवरील मालमत्ता कर माफ करणेबाबत

**(४६) ४६२५ (०१-०५-२०२५). श्रीमती सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई महानगरपालिका व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामधील ५०० चौरस फुटापर्यतच्या घरांवरील मालमत्ता कर माफ करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात लोकप्रतिनिधिंनी माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्या सुमारास मा.उपमुख्यमंत्री महोदयांकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०४-२०२६) :** (१) नाही हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे अभिप्राय व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील करासंदर्भातील तरतुदी विचारात घेवून सदरचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिपळूण नगरपरिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामास निधी उपलब्ध देण्याबाबत

**(४७) ४६७७ (२३-०४-२०२५). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण नगरपरिषद ही ब वर्ग नगर परिषदचेची स्थापना दिनांक १६ डिसेंबर, १८७६ रोजी झाली असून इमारत ही सन १९४२ या साली बांधण्यात आलेली असुन त्यानंतर टप्याटप्याने विस्तारीत बांधकाम झालेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्वीच्या जुन्या बांधकामावर व लगत अशा स्वरुपाचे बांधकाम झालेले असल्यामुळे वेळोवेळी कराव्या लागणाऱ्या दुरूस्त्या व डागडुजी तसेच छताच्या नादुरुस्तीमुळे होणारी गळती व त्याची दुरुस्ती यामुळे सद्य:स्थितीत संपुर्ण इमारत मोठया प्रमाणात नादुरुस्त झालेली आहे. हे खरे आहे काय.

(३) असल्यास, स्ट्रक्चरल रिपोर्ट नुसार इमारतीचा बहुतांशी भाग धोकादायक आहे तसेच लोकसंख्या जवळपास १ लाखाहून अधिक झाली असल्याने कार्यालयीन कामकाजासाठी सध्याची इमारत अपुरी पडत असल्याने नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामास निधी मिळण्याबाबतचा प्रस्ताव प्रधान सचिव, नगर विकास-२ यांचे कार्यालयाकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन इमारतीसाठी निधी वितरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०४-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे

(२) होय, हे खरे आहे

(३) होय, हे खरे आहे

(४) नगरविकास विभागाच्या दि.२४ डिसेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.११.०० कोटी निधी चिपळूण नगरपरिषद प्रशासकीय इमारत बांधकामाकरीता मंजूर करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेत समाविष्ट असलेल्या गावांच्या कर आकारणी बाबत

**(४८) ४८७२ (०१-०५-२०२५). श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेत समाविष्ट असलेल्या गावांच्या कर आकारणीला स्थगिती देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन कर प्रणाली अस्तित्वात येईपर्यंत ग्रामपंचायत आकारत असलेल्या कर आकारणीपेक्षा दुप्पट आकारणी करू नये असे आदेश तत्कालीन मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्र्यांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नवीन कर प्रणाली निर्धारित करण्यात आली आहे काय, तसेच ग्रामपंचायत आकारत असलेल्या कर आकारणीपेक्षा दुप्पट कर आकारणी न करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट ३२ गावातील मालमत्ता कर हा ग्रामपंचायतीकडून आकारण्यात येणाऱ्या कराच्या दुप्पट दराने आकारण्यात यावा आणि सदर गावांचा मालमत्ता कर आधीच्या ग्रामपंचायत कराच्या दुपटीपेक्षा जास्त होणार नाही अशा पद्धतीने पुर्नविलोकन (REVISION) करेपर्यंत मालमत्ता कर वसूल करण्यास दिनांक १५/१०/२०२४ च्या पत्रान्वये स्थगिती देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कराड (जि. सातारा) तालुक्यातील वाकुर्डे योजनेचे पाणी दरमहा दक्षिण मांड नदीत सोडण्याबाबत

**(४९) ५०४० (२९-०४-२०२५). श्री.अतुलबाबा भोसले (कराड दक्षिण) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड (जि. सातारा) तालुक्यातील काले, ओंड, ओंडोशी, नांदगाव, मनव, उंडाळे, शेवाळवाडी, जिंती, टाळगाव, घोगाव, येणपे, वाठार, झुजारवाडी, पवारवाडी, चोरमारवाडी, माटेकरवाडी, येळगाव, गोटेवाडी, म्हारूगडेवाडी, आकाईवाडी, साळशिरंबे इत्यादी गावातील ग्रामस्थांना वाकुर्डे योजनेच्या माध्यमातून शेतीसाठी व पिण्यासाठी पाणीपुरवठा केला जात असून दरवर्षी उन्हाळयामध्ये येथील ग्रामस्थांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेच्या माध्यमातून ग्रामस्थांना नियमित पाणीपुरवठा होण्याबाबत, शासनाने सकारात्मक धोरण ठेवलेले असून दरवर्षी वाकुर्डे योजनेचे पाणी दक्षिण मांड नदीत सोडण्यात येते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पाणी टंचाईमुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी यंदा उन्हाळा सुरु होण्यापूर्वीच, या काळात पाण्याची टंचाई उद्‌भवू नये, यासाठी आत्तापासूनच दर महिन्याला वाकुर्डे योजनेचे पाणी दक्षिण मांड नदीत सोडण्याची गरज असल्यामुळे याबाबत संबंधित विभागाने नियोजन केले आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-०४-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

वाकुर्डे उपसा सिंचन योजनेंतर्गत कराड तालुक्यातील टाळगाव, उंडाळे, मनव व घोगाव येथे ४ को.प. बंधा-यांची कामे पूर्ण झाली असून टाळगाव, उंडाळे, मनव, घोगाव नांदगाव, शेवाळवाडी, जिंती, येणपे, माटेकरवाडी, येळगाव, गोटेवाडी, म्हारूगडेवाडी, आकाईवाडी आणि साळशिरंबे या कराड तालुक्यातील १४ गावातील २२०० हेक्टर क्षेत्रास सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार आहे. उर्वरीत ७ गावांपैकी काले, वाठार, झुंजारवाडी, पवारवाडी व चोरमारवाडी ही गावे कोणत्याही प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात नसून ओंड व ओंडीशी ही गावे येवती मध्यम प्रकल्पात समाविष्ट असून सिंचनाचा लाभ मिळत आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) वाकुर्डे उपसा सिंचन योजनेमधून दिनांक २९.०३.२०२५ ते दिनांक १५.०४.२०२५ या कालावधीत एकूण २५.४२ दलघफू इतके पाणी दक्षिण मांड नदीत सोडण्यात आले आहे. तसेच आगामी आवर्तनाबाबत सन २०२५-२६ मध्ये कालवा सल्लागार समिती मधील निर्णयानुसार कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उल्हासनगर मधील अनधिकृत विकासकामे नियमाधींन प्रक्रियेमध्ये करण्याबाबत

**(५०) ६०९६ (०१-०५-२०२५). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्रीमती सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर शहरात अनधिकृत विकासकामे नियमाधींन करण्याची प्रक्रिया सुरु असून या मध्ये नागरिक मोठ्या प्रमाणावर भाग घेत असून सदर नियमित प्रक्रिया संथ गतीने सुरु असून याबाबत माहिती नागरिकांना उपलब्ध होण्यासाठी तसेच सदर प्रक्रियांमध्ये गती वाढवावी अशी मागणी मा लोकप्रतिनिधी यांनी मा मुख्यमंत्री मा उपमुख्यमंत्री प्रधान सचिव नगरविकास तथा आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांच्या कडे दिनांक ३ फेबुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बाबतची सर्व माहिती नागरिकांना उपलब्ध होण्यासाठी तसेच नागरिकांच्या सेवेसाठी एक खिडकी योजना सुरु करावी अशी मागणी उल्हासनगर महानगरपालिकेकडे वारंवार करून सुरु करण्यात न आल्याने नागरिकांना पूर्ण माहिती मिळत नसल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बाबत उल्हासनगर महानगरपालिकेकडे आजपर्यंत किती प्रस्ताव प्राप्त झाले व किती प्रस्तावना मान्यता दिली आहे ,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागरिकांच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) दिनांक ६ जानेवारी, २०२५ रोजीच्या पत्रान्वये एक खिडकी योजना सुरु करण्याबाबत विचारणा केली आहे. यासंदर्भात महानगरपालिकेकडून माहिती देण्यात आली आहे.

(३) सुधारीत अधिनियम २०२२ व शासन अधिसूचना दिनांक १७ फेब्रुवारी, २०२३ नुसार (P-Line प्रमाणे) एकुण ३९९ अर्ज प्राप्त झाले असून त्यावर कार्यवाही चालू आहे.

(४) उक्त प्रलंबित प्रकरणाची स्थळपाहणी करून, तांत्रिक छाननी केलेली आहे. तथापि, अनधिकृत विकासकामे नियमाधीन करण्याच्या प्रलंबित प्रकरणाबाबत तत्कालीन आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी दिलेल्या निर्देशानुसार UCRMS (Unauthorised Constructions Regularisation Management System) ही संगणक प्रणाली विकसित केलेली आहे. लवकरच संगणक प्रणाली कार्यान्वित करण्याची कार्यवाही महानगरपालिकेद्वारे सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.